महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

● संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: २०, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार १३ ऑगस्ट २०२४ ते सोमवार १९ ऑगस्ट २०२४ ● POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 ● RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेतून अर्थव्यवस्थेला चालना मिळेल



■ मुंबई : विशाल कारंडे

‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना’ व ‘अन्नपूर्णा योजना’ या सर्वसामान्य महिलांच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी सुरू करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना राज्यातील अर्थव्यवस्थेला चालना देणारी योजना आहे. शासन राज्याच्या विकासाला प्राधान्य देत असतानाच कल्याणकारी योजनाही राबवित असून यातून विकास व कल्याण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. इंडिया टुडे ग्रुपच्या ‘मुंबई तक बैठक’ कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. मुंबई तकच्या अँकर हर्षदा परब, अनुजा धाक्रस आणि माधवी देसाई यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची आज मुलाखत घेतली. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, हे सर्वसामान्यांचे शासन आहे. मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजना, अन्नपूर्णा योजना याबरोबरच वयोश्री योजना, तीर्थक्षेत्र योजना अशा अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेची तयारी ही गेल्या आठ-नऊ महिन्यांपासून सुरू होती.




(शेष पृष्ठ ५ वर)

### संक्षिप्त

### वडपे ते ठाणे जलद आणि वाहतूक कोंडीमुक्त प्रवास मे २०२५ पासून

■ मुंबई : नितीन देवळेकर

मुंबई-नाशिक महामार्गावरील वडपे ते ठाणे दरम्यानच्या २३ किमीच्या महामार्गाच्या वाहतूक कोंडीला आणि खड्डयांना त्रासलेल्या प्रवाशांची आता यातून मे २०२५ मध्ये सुटका होणार आहे. वडपे ते ठाणे दरम्यानच्या महामार्गाच्या आठ पदरीकरण आणि काँक्रीटीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते



विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) सुरु आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र या कामास विलंब झाला असून आतापर्यंत केवळ ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. तर आता उर्वरित काम पूर्ण होण्यास मे २०२५ उजाडणार आहे. नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ हा एकूण १४२ किमीचा महामार्ग आहे. या रस्त्याच्या ११८.२० किमीच्या आठपदरीकरण आणि काँक्रीटकरणाचे काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) केले जात आहे. तर वडपे ते ठाणे अशा २३.८०० किमीच्या महामार्गाचे काम एमएसआरडीसीकडून सुरु आहे.

### रोहित पवारांचं राज ठाकरेंना आव्हान; म्हणाले, ‘हिंमत असेल तर....’

■ मुंबई : सम्यक कासारे

मागील काही महिन्यांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. मराठा आरक्षणासंदर्भात राजकीय नेत्यांनी भूमिका स्पष्ट करण्यासाठी मराठा क्रांती ठोक मोर्चाच्यावतीने आंदोलन करण्यात येत आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे




अध्यक्ष शरद पवार यांच्या निवासस्थानाबाहेर मराठा क्रांती ठोक मोर्चाच्यावतीने आंदोलन करण्यात आलं. तर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौऱ्यावेळी टीका करताना शरद पवार आणि उद्धव ठाकरे हे जातीपातीचं राजकारण करत असल्याचा आरोप केला होता. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शरद पवारांच्या घरासमोरील आंदोलनावर आणि राज ठाकरे यांच्या टीकेवर प्रतिक्रिया देत हल्लाबोल केला आहे. ‘राज ठाकरे यांच्यामध्ये हिंमत असेल तर त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात बोलावं’, असं आव्हान रोहित पवार यांनी दिलं आहे. ‘लोकशाही पद्धतीने सर्वांना आंदोलन करण्याचा अधिकार आहे.

### मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे निवडणुकीच्या रिंगणात

■ मुंबई : यश सावंत

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त संजय पांडे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांनी प्रचारालाही सुरूवात केली आहे. संजय पांडे यांनी त्यांच्या अधिकृत फेसबुक अकाऊंटवर पोस्ट करत वर्सोवातून विधानसभा निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे बेकायदेशीर फोन टॅपिंग प्रकरणामुळे चर्चेत आलेल्या संजय पांडेंनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतल्याने राजकीय वर्तुळातही उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकांची अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. पण राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी मात्र मोर्चेबांधणी सुरू केली आहे. विधानसभेसाठी रणनिती आखण्यास सुरुवात केली आहे. सभा, बैठका, चर्चासत्रांना सुरूवात झाली आहे. राजकीय मंडळींचे दौरे सुरू झाले आहेत. अशातच माजी पोलीस



आयुक्त संजय पांडे यांनीदेखील वर्सोवा विधानसभा मतदारसंघातून विधानसभेच्या मैदानात उडी घेतली आहे. त्यांनी स्वत:च आपल्या उमेदवारीची घोषणाही केली आहे. पण त्याचबरोबर कोणत्याही पक्षासोबत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. रविवारी (११ ऑगस्ट) संजय पांडे यांनी वर्सोवाच्या झुलेलाल मंदिरात दर्शन घेत प्रचाराला सुरूवातही केली.

### ‘आम्ही अपयशी ठरलो’, बांगलादेशमधील सरकारने मागितली हिंदूंची माफी, शेख हसीनांच्या पक्षाला इशारा देत म्हणाले...

■ मुंबई : गणेश बागडे

बांगलादेशमध्ये अराजकता माजली आहे. देशभर गेल्या काही दिवसांपासून हिंसाचार होत आहे. अशातच आता धार्मिक कट्टरतावादी बांगलादेशमधील अल्पसंख्यांक हिंदूंवर अत्याचार करू लागले आहेत. हिंदूंच्या वस्त्यांवर हल्ले होत आहेत, हिंदूंसह इतर अल्पसंख्याकांची त्यांची घरं पेटवली जात आहेत, मंदिरांची नासधुस-तोडफोड होत आहे. त्यानंतर अल्पसंख्याक हिंदूंनी देखील आंदोलन सुरू केलं आहे. दरम्यान, बांगलादेशमधील हंगामी सरकारमधील गृह विभागाचे सल्लागार शखावत हुसैन यांनी मान्य केलं आहे की त्यांच्या देशात अल्पसंख्याकांवर हल्ले होत आहेत आणि त्यांना सुरक्षा पुरवण्यात बांगलादेशी सरकार व सुरक्षा यंत्रणा अपयशी ठरली आहे. जनरल एम. शखावत हुसैन यांनी बांगलादेशमधील हिंदूंची माफी मागितली आहे. तसेच त्यांनी माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा पक्ष आवामी लीगवर हिंसाचार पसरवण्याचा आरोप करत कारवाईचा इशारा दिला आहे. शखावत हुसैन यांनी बांगलादेशातील हिंदू समुदायाची माफी मागितली आहे. सरकार त्यांचं संरक्षण करण्यात अपयशी ठरल्याची खंत हुसैन यांनी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, ‘या सगळ्याला केवळ सरकारचं नव्हे तर येथील बहुसंख्याकांचा समुदाय जबाबदार आहे. तसेच आम्ही देखील आमचं कर्तव्य पार पाडण्यात अपयशी ठरलो आहोत. आता परिस्थिती आमच्या नियंत्रणात येत आहे. लवकरच स्थिती सुधारेल अशी अपेक्षा आहे. शखावत यांनी यावेळी शेख हसीना यांच्या पक्षातील लोकांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. ते म्हणाले, आवामी लीगच्या लोकांनी कोणत्याही प्रकारे अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. बांगलादेशमधील नोबेल पुरस्कारप्राप्त अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांनी बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे प्रमुख सल्लागार म्हणून शपथ घेतली आहे.




### खासदार सुप्रिया सुळेंचं व्हॉट्सअॅप हॅक; हॅकरने मागितले ४०० डॉलर्स

■ पुणे : अभिजीत येरल्लू

व्हॉट्सअॅप आणि ईमेल हॅक होण्याच्या घटना वारंवार समोर येत असतात. सरकारी अधिकाऱ्यांचेही फोन हॅक झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. अशातच आता खासदार सुप्रिया सुळे यांचा फोन आणि व्हॉट्सअॅप हॅक झाल्याचं वृत्त समोर आलं होतं. त्यानंतर सुळे यांनी पुणे पोलिसांत तक्रार दाखल केली होती. सायबर पोलिसांच्या मदतीने त्या त्यांचं अकाऊंट रिकव्हर करण्याचा प्रयत्न करत होत्या. दरम्यान, हॅकरने त्यांचं अकाऊंट परत देण्याच्या बदल्यात त्यांच्याकडे ४०० डॉलर्सची (तब्बल ३३,५०० रुपये) मागणी केली. त्यांचं व्हॉट्सअॅप अकाउंट दुसऱ्या डिव्हाईसवरून चालवलं जात होतं. दरम्यान, सायबर पोलिसांनी सुप्रिया सुळे यांचं अकाउंट रिकव्हर करून दिलं आहे. खासदार सुळे यांनी स्वतःच एक्स या समाजमाध्यमाद्वारे माहिती दिली होती की ‘माझा फोन आणि व्हॉट्सअॅप हॅक झालं आहे. कोणीही मला मेसेज करू नये. याबाबत मी पोलीस तक्रार करत आहे. कृपया याची नोंद घ्यावी’. सुप्रिया सुळे यांच्यासारख्या खासदाराचा फोन व व्हॉट्सअॅप हॅक झाल्याच्या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. व्हॉट्सअॅप रिकव्हर झाल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी एक्सवर एक पोस्ट केली.



(शेष पृष्ठ ५ वर)

### ‘माझ्या जीवाला धोका, पण...’, अजित पवार यांचं महत्त्वाचं विधान

■ नाशिक: सचिन कदम

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी जनसन्मान यात्र काढली असून यामाध्यमातून ते जनतेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. यादरम्यान आज धुळे येथे सभेला संबोधित करत असताना अजित पवार यांनी माझ्या जीवाला धोका असल्याचा अहवाल गुप्त वार्ता विभागाने दिला असल्याचे सांगितले. नाशिकला येथे विमानतळावर उतरलो असतानाच पोलीस अधिकाऱ्यांनी मला मालेगावला जाऊ नका, तुमच्या जीवाला धोका आहे, असे सांगितले होते. गुप्तचर विभागाने तुम्हाला धोका असल्याची सूचना दिली असून त्याबद्दल माध्यमातही बातम्या आल्या आहेत. त्यामुळेच चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे जिथे मोठ्या संख्येने महिला असतील, तिथे तुम्ही गर्दीत जाऊ नका. तसेच मालेगाव आणि धुळे याठिकाणी गेल्यास माझ्या जीवाला संभाव्य धोका असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी माझ्या लक्षात आणून दिले आहे, असे अजित पवार यांनी धुळे जिल्ह्यात घेतलेल्या सभेत सांगितले. ‘पण माय माऊलींनो



तुम्ही माझ्या हातावर बांधलेल्या राख्या जोपर्यंत माझ्या हातात आहेत, तोपर्यंत मला दुसऱ्या कुणाचीही आवश्यकता नाही. माझ्या बहिणींचे आशीर्वाद, राखीचे कवच आणि प्रेमाची गाठ हे मला कोणताही धोका होऊ देणार नाही, असे माझे अंतर्मन सांगत आहे’, असेही अजित पवार धुळे येथील सभेदरम्यान म्हणाले. अजित पवार यांना सातत्याने धमक्या येत आहेत. मात्र ते पोकळ धमक्यांना न घाबरता त्यांचा दौरा सुरूच ठेवणार आहेत. आमची जनसन्मान यात्रा सुरूच राहणार असल्याचे कॅबिनेट मंत्री अनिल पाटील यांनी धुळे येथे माध्यमांना माहिती देताना सांगितले.

### उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावरील हल्ल्यानंतर राज ठाकरेंचं मनसैनिकांना आवाहन; म्हणाले, ‘तुम्ही हे सगळं...’

■ मुंबई : गणेश बागडे

मनसेच्या कार्यकर्त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर शनिवारी रात्री नारळ फेकत हल्ला केल्याची घटना ठाण्यात घडली. या घटनेनंतर मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्यासह मनसेच्या काही कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेचे कार्यकर्ते आमने-सामने येण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण तापलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावरील हल्ल्यानंतर आता राज ठाकरे यांनी एक्स अकाउंटवर (ट्विटर) पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. ‘जशास तसं नाही तर जशास दुप्पट असं उत्तर देणं म्हणजे



काय असतं याची चुणूक काल तुम्ही दाखवली, ती पुरेशी आहे. त्यामुळे तुम्ही सगळं हे थांबवा असं माझं, माझ्या महाराष्ट्र सैनिकांना आवाहन आहे’, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. ‘काल ठाण्यात उद्धव ठाकरेंच्या ताफ्यासमोर माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी जी निदर्शनं केली, ती संतापातून आलेली प्रतिक्रिया होती. माझ्या नवनिर्माण यात्रेच्या दरम्यान जी काही विघ्न उभी करण्याचे प्रयत्न धाराशिवपासून सुरु झाले. धाराशिवमध्ये निदर्शनाला आलेले, दाखवायला मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या नावाखाली घोषणा देत होते. पण पुढे लक्षात आले की त्यांचा या आंदोलनाशी काहीच संबंध नव्हता. ते तर शरद पवार आणि उद्धव ठाकरे गटांशी संबंधित होते आणि या सगळ्या गोष्टी सोशल मीडियातून उघड्या पडल्या. (शेष पृष्ठ ५ वर)

### लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही चित्र बदला, शरद पवार यांची शेतकऱ्यांना हाक


■ सोलापूर : प्रथमेश चव्हाण

देशातील आणि राज्यातील भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या आड येणारे आहे. देशभर सरकारविरोधात शेतकऱ्यांमध्ये रोष वाढला असून, त्याची प्रचिती लोकसभा निवडणुकीत आली आहे. लोकसभेप्रमाणेच आता महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी निवडणुकीतही चित्र बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून सरकार बदलावे, अशी हाक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली.

बार्शी येथे रविवारी दुपारी झालेल्या शेतकरी संवाद मेळाव्यात पवार बोलत होते. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रोहित पवार, पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे आदी उपस्थित होते. मेळाव्याचे संयोजक विश्वास बारबोले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शरद पवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहा वर्षापूर्वी सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या शेती मालाला उत्पादन खर्चाच्या दुप्पट भाव मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु सत्तेत आल्यानंतर मागील दहा वर्षात शेतीमालाला एकदाही दुप्पट भाव मिळाला नाही, तर उलट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या पूर्वीपेक्षा दुप्पट झाल्या. सरकारची शेतीविषयक धोरणे हिताआड येणारे आहेत. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत ऐतिहासिक निर्णय घेऊन भाजपला त्यांची जागा दाखविली. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीतही असाच निर्णय घ्यायचा आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकरी यांच्या हिताची जपणूक केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.



यावेळी आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. राज्यात कमी दरामुळे आणि जास्त उत्पादन खर्चामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २० हजार कोटींचा फटका सहन करावा लागला. तर कांदा निर्यातबंदीमुळे पाच हजार कोटींचे नुकसान शेतकऱ्यांना सोसावे लागले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कांदा निर्यातबंदीचा मोदी सरकारचा निर्णय चुकीचा होता, अशी कबुली दिली. परंतु अजित पवार यांनी भाजपच्या सोबत जाणे हेच मुळात चुकीचे होते. लाडकी बहीण योजना सरकारने घाई गडबडीत आणली आहे. राज्यात महाविकास आघाडी सत्तेत येणार आहे. त्यानंतर लाडकी बहीण योजना बंद न करता उलट, त्याची व्याप्ती वाढविली जाईल, असेही आश्वासन आमदार रोहित पवार यांनी दिले.




## सहकार क्षेत्राच्या उद्धारासाठी...

केंद्र सरकारने नऊ जुलै २०२१ या दिवशी एका अध्यादेशाद्वारा नवीन सहकार मंत्रालय सुरु केले. नवीन सहकार धोरण हे आगामी एक महिन्यात जाहीर केले जाईल, असे केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शहा यांनी घोषित केले आहे. पुढील पाच वर्षांत प्रत्येक पंचायतीमध्ये कमीत कमी एक सहकारी संस्था स्थापन केली जाईल. याचाच अर्थ अंदाजे दोन लाख नवीन सहकारी संस्था डेअरी, कुक्कुटपालन, अन्नपदार्थप्रक्रिया, फळे, फुले, भाजीपाला, मत्स्यपालन या व अन्य क्षेत्रांत स्थापन केल्या जातील; जेणेकरून रोजगार व कुटुंबांचे आर्थिक उत्पन्नदेखील वाढू शकेल. याशिवाय इतरही काही महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे त्यांनी जाहीर केली आहेत. सहकारात काम करणाऱ्यांना तांत्रिक आणि व्यवस्थापनाचे शिक्षण-प्रशिक्षण देण्यासाठी, संशोधन आणि विकासाला चालना देण्यासाठी आणि संलग्नांच्या नेटवर्कद्वारे देशातील सहकारी चळवळ मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील 'सहकार विद्यापीठ' स्थापण्याचा प्रस्ताव सररकारच्या विचाराधीन आहे. एका लेखी उत्तरात मंत्रिमहोदयांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रस्तावित विद्यापीठ सहकार क्षेत्राशी समन्वय साधून काम करेल आणि शिक्षण व प्रशिक्षणासाठी सर्वसमावेशक, एकात्मिक आणि प्रमाणित संरचना असेल; जेणेकरून सहकार क्षेत्रातील विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळाचा स्थिर, पुरेसा आणि दर्जेदार पुरवठा निश्चित होईल. देशाच्या सामाजिक आर्थिक उन्नतीमध्ये सहकार क्षेत्राचा फार मोठा वाटा आहे. आजमितीस भारतात सुमारे आठ लाख पन्नास हजार सहकारी सोसायट्या आहेत; ज्यांचे अंदाजे ३० कोटी सदस्य आहेत. यापैकी सर्वात जास्त म्हणजे २.२२ लाख सोसायट्या केवळ महाराष्ट्रात आहेत. यापैकी सर्वात जास्त सहकारी सोसायट्या पुणे जिल्ह्यात आहेत. उतरत्या क्रमाने गुजरात, उत्तरप्रदेश, तेलंगण, मध्य प्रदेश, कर्नाटक या काही अन्य राज्यातदेखील सहकारी सोसायट्या मोठ्या प्रमाणात आहेत. यापैकी जास्तीतजास्त सहकारी सोसायट्या या गृहबांधणी, कृषी,



वित्तीय, साखर, दुग्धउत्पादन व वितरण, हातमाग, शिक्षण व अन्य क्षेत्रात कार्यरत आहेत. भारतात सुमारे ६५हजार प्राथमिक कृषी सहकारी सोसायट्या आहेत. हे सर्व वरकरणी विधायक वाटले तरी खाली दिलेल्या सहकार क्षेत्राला भेडसावणाऱ्या समस्यांचा विचार करून योग्य ती पावले उचलली तर सहकार क्षेत्राला निश्चितच उज्ज्वल भविष्यकाळ असेल.

१. अनेक सोसायट्यांच्या आर्थिक उलाढाली खूप कमी रकमेच्या आहेत. त्यांची व्यवसाय वाढविण्याची उत्पादन, विक्री व वितरणक्षमता खूप मर्यादित आहे. अनेक संस्था या केवळ लघु उद्योग म्हणजे एखादे गाव किंवा तालुका या मर्यादित हद्दीतच व्यवसाय करण्याच्या क्षमतेच्या आहेत. त्यांना अपुरे भांडवल व आधुनिक तंत्रज्ञान याची वानवा आहे.

२. दूरगामी व्यवसायिक दृष्टीचा अभाव हा मोठा प्रश्न आहे. परिणामी सहकार क्षेत्र लांबवर झेप घेऊ शकत नाही. त्यासाठी धोरणात्मक तसेच आधुनिक कार्यप्रणालीचा त्याचबरोबर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. यादृष्टीने फारसा विचार केला जात नाही. त्यामुळे अनेक सहकारी संस्था उपलब्ध क्षमतेच्या जेमतेमच व्यवसाय करतात. त्यामुळे आर्थिक स्थैर्यदेखील मिळत नाही.

३. प्रशिक्षित, अनुभवी व कार्यक्षम कर्मचारी या क्षेत्राकडे आकृष्ट होत नाहीत. कर्तबगार कर्मचारी त्यांची उज्ज्वल भविष्याची आकांक्षा असल्याने इकडे वळत नाहीत. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व आर्थिक समृद्धी या गोष्टींच्याअभावी ते सहकार क्षेत्रात येत नाहीत. त्यामुळे सहकारी संस्था फार प्रगती करू शकत नाहीत.

४. अनेक सहकारी बँका, पतसंस्था, साखर कारखाने, दुग्धप्रकल्प यामध्ये राजकीय व्यक्तींचा प्रभाव असल्याने कार्यप्रणालीनिरपेक्ष तसेच पूर्ण क्षमतेने इच्छा असूनदेखील काम करून शकत नाहीत. अनेक निर्णय केवळ राजकीय हित सांभाळण्यासाठी घेतले जातात जे त्या सहकारी संस्थेच्या हिताचे असतीलच असे खात्रीलायकरीत्या सांगता येत नाही.

५. सर्व सहकारी संस्थांचे कामकाज हे लोकशाही पद्धतीने चालावे, असे अपेक्षित असले तरी प्रत्यक्षात सर्व सहकारी संस्थांमध्ये असे होतेच असे नाही. केवळ काही प्रभावी व्यक्ती सहकारी संस्थेचा ताबा घेतात व दबाव धोरण राबवून स्वतःच्या फायद्याचे निर्णय घेतात; जे सभासदांमध्ये गैरसमज पसरवितात. त्यामुळे अनेक सभासद सहकारी संस्थेच्या संचालक मंडळावर कर्तबगार असूनदेखील काम करण्यास इच्छुक नसतात.

६. सहकार हा विषय सामायिक सूचीत आहे. केंद्र तसेच राज्य सरकारे याबाबतीत राज्यात आपले स्वतःचे सहकार धोरण, नियम किंवा कार्यप्रणाली राबवू शकतात. त्यामुळे राज्य विविध सरकारे व केंद्र सरकार यांची कार्यप्रणाली किंवा नियम यात ताळमेळ व सुसूत्रीकरण होत नाही. अनेकदा सरकारे एकमेकांच्या कार्यक्षेत्रात ढवळाढवळ करत असतात.

७. सहकारी न्यायालये व त्यांची कार्यप्रणाली यात आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत. आज सहकारी न्यायालयात 'तारीख पे तारीख' चालू आहे. निर्णय कधीही वेळेवर लागत नाहीत. तसेच कायदेदेखील सुटसुटीत, स्पष्ट व सर्वसामान्यांना समजतील, अशा भाषेत असणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रिया ही केवळ कागदी घोडे पळविण्याची आहे. सहकारी संस्थांचे पदसिद्ध अधिकारी हीदेखील सहकारी कायद्यांच्या बाबतीत अनभिज्ञ असतात. या सर्वांना पदभार संभाळण्यापूर्वी सहकारी कायद्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, जेणेकरून ते दैनंदिन कार्यप्रणालीमध्ये कमीत कमी चुका करतील.

८. मार्केटिंग, जाहिरातकला, वेब साईट, सोशल मीडियाचा प्रभावी वापर, संभाषणचातुर्य, व्यवसायवृद्धी व विक्रीकला, निर्यात यासाठी आवश्यक असलेले कौशल्य याचा सहकारी क्षेत्रातील अनेक कर्मचारी अनभिज्ञ आहेत. तेव्हा त्यांच्यासाठी प्रशिक्षणवर्ग हे फार लाभदायक ठरतील.

# पश्चिम आशियातील युद्धज्वाला

**पश्चिम आशियातील परिस्थिती हाताबाहेर जात त्याची निर्नायकीकडे वाटचाल सुरू आहे. इस्राईलचे पंतप्रधान नेतान्याहू आपल्याविरोधातील नाराजी निष्प्रभ करण्यासाठी आक्रमक राष्ट्रवादाचे यज्ञकुंड पेटते कसे राहील, या प्रयत्नात आहेत, तर अमेरिकी राज्यकर्ते निवडणुकीवर डोळा ठेवून अगदी संकुचित दृष्टिकोनातून इस्राईल-हमास-इराण संघर्षाकडे पाहात आहेत.**

सा त ऑक्टोबर २०२३ रोजी 'हमास' या पॅलेस्टाईनस्थित दहशतवादी गटाने तेथील इतर दहशतवादी गटांसोबत समन्वय साधत गाझा पट्टीतून इस्राईलमध्ये घुसून हल्ला चढवला. प्रत्यक्षपणे आणि रॉकेटच्या माध्यमातून केलेल्या या हल्ल्यात सुमारे १२०० मृत्युमुखी पडले. गाझा पट्टीत परत जाताना ''हमास''ने सुमारे २५० इस्राईलच्या नागरिकांचे अपहरण करीत त्यांना ओलीस ठेवले. चवताळलेल्या इस्राईलने त्या दिवसानंतर आजतागायत पॅलेस्टाईन, गाझावर जवळपास रोज हल्ला करत युद्धमान परिस्थिती कायम ठेवली आहे. या संघर्षाची व्याप्ती वाढत असून त्याचे लोण आता लेबेनॉनपासून ते थेट इराणपर्यंत पोहोचले आहे. संघर्षातील कोणताही एक घटक नमते घ्यायला तयार नसताना हा पेच नजीकच्या काळात सुटण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे, तुम्हाला-आम्हाला ''आता पुढे काय?'' हा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

इस्राईलच्या शासकीय सुट्टीचा दिवस निवडून हमासने केलेला हल्ला इस्राईलचा '९/११' समजला जातो. अपयशी ठरलेली गुप्तचर यंत्रणा, लष्करी हेर आणि सरतेशेवटी प्रशासनाचे प्रमुख म्हणून याची नैतिक जबाबदारी पंतप्रधान नेतान्याहू यांच्यावर ओघाने आली. युद्धखोर म्हणून ओळखले जाणारे आणि पूर्ण बहुमत नसताना युती केलेल्या पक्षांच्या कुबड्यांवर सरकार हाकणारे नेतान्याहू अशाच एखाद्या घटनेची वाट बघत असावेत. त्यांनी राष्ट्रीय अस्मितेचा राग आळवत पॅलेस्टाईनला प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली. शाळा, धर्मस्थळे, रुग्णालये असा कुठलाही मुलाहिजा न बाळगता इस्राईलने निरंकुश कत्तल करून आपला बदला घेतला. आता १० महिने उलटून गेल्यानंतरही नेतान्याहू आपल्या प्रतिशोधाला पूर्णविराम देताना दिसत नाहीत.

मागील आठवड्यात इस्राईल-सीरियाच्या सीमेवर असणाऱ्या ''गोलान हाईट्स'' पठारावर झालेल्या हल्ल्यात इस्राईलची १२ मुले मृत्युमुखी पडली. तो हल्ला लेबेनॉनमधील दहशतवादी गट असलेल्या 'हेजबोल्लाह'ने केल्याचा ठपका इस्राईलने ठेवला. आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच इस्राईलने लेबेनॉनच्या राजधानीत हवाई हल्ला करत ''हेजबोल्लाह''च्या वरिष्ठ अधिकाऱ्याची हत्या केली. हे कमी म्हणून की काय, याच सुमारास ''हमास''चे प्रमुख इस्माईल हनियेह हे इराणच्या भेटीवर असताना, इराणची राजधानी असलेल्या तेहरान शहरातील शासकीय निवास्थानात त्यांचा खून करण्यात आला. तो खून आपण केल्याची कबुली इस्राईलने दिली नसली तरी नेतान्याहू सरकारमधील मंत्र्यांच्या प्रतिक्रिया तेच सूचित करतात.

''हेजबोल्लाह''सारख्या खमक्या आणि बऱ्यापैकी संघटित असलेल्या गटाच्या वरिष्ठाचा काटा काढल्याने त्या गटात सूडाची भावना जोर धरत आहे. तर दुसरीकडे, आपल्या देशामध्ये मानाचा पाहुणा म्हणून निमंत्रित केलेल्या इस्माईल हनिये यांचा खून इराणच्या जिव्हारी लागल्याचे दिसत आहे. वरील दोन्ही खून हे त्या त्या सार्वभौम देशाच्या थेट राजधानीत, तगड्या सरकारी सुरक्षेला भेदून केल्यामुळे त्याचा झटका मोठा




समजला जात आहे. ''हमास'', ''हेजबोल्लाह'', ''हुती'' अशा दहशतवादी गटांचा पुरस्कार करणारा इराणच सुरक्षित नाही, ही बाब गंभीर आहे. पाल्यासमोरच पालकाने मार खावा अशी इराणची अवस्था झाली आहे. त्यामुळे, नाईलाजाने इराण इस्राईलवर हल्ला करू शकतो. आता इराण पश्चिम आशियाभर पसरलेल्या आपल्या प्याद्यांकरवी इस्राईलशी युद्ध छेडतो की थेट दोन हात करतो हे बघणे बाकी आहे. जी गोष्ट इराणची तीच लेबेनॉनची. गेले १० महिने इस्राईल-हमास संघर्ष सुरु असताना लेबेनॉन अथवा तेथील ''हेजबोल्लाह''ने त्यात थेट सहभाग घेतला नाही. २००६ नंतर लेबेनॉन-इस्राईलमध्ये थेट युद्ध झाले नाही. आधीच डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेला अजून ओहोटी नको म्हणून सावध पवित्र घेणाऱ्या ''हेजबोल्लाह''शी इस्राईलने कुरापत काढल्याचे चित्र दिसत आहे.

युद्धामुळे येणारी सर्व प्रकारची अस्थिरता कोणत्याही राष्ट्राला सहज परवडण्यासारखी नसते. युद्ध सुरु करणे सोपे असले तरी ते थांबवणे तितकेच अवघड असते. फक्त एक युद्ध देशाच्या अर्थव्यवस्थेची मान टाकायला पुरेसे ठरते. अशा वेळी लेबेनॉन आणि इराण या देशांमध्ये हल्ला करून इस्राईलने युद्धाच्या आणखी दोन आघाड्या उघडायला संमती दिल्यासारखे आहे. पॅलेस्टाईनसोबत सुरू असलेला संघर्ष थंड होत नसताना त्यात आणखी दोन ठिकाणी पेटू पाहणाऱ्या रणामुळे संपूर्ण पश्चिम आशियात धोक्याची घंटा घणघणू लागली आहे. दिवसेंदिवस मरण पावलेल्या, जखमी झालेल्या आणि विस्थापित होणाऱ्या नागरिकांचा आकडा फुगत असताना नेतान्याहू यांनी सामंजस्य दाखवावे म्हणून अमेरिकी अध्यक्ष जो बायडेन यांनी प्रयत्न करून पहिले. नेतान्याहू ऐकत नाहीत हे समजल्यावर त्यांनी अमेरिकी शस्त्रांची एक तुकडी रोखून पहिली. मात्र, लेबेनॉन आणि इराणला युद्धात ओढून अमेरिका यातून बाजूला होऊच शकणार नाही, असा प्रयत्न नेतान्याहू करीत आहेत.

**लोकप्रियता घसरणीला**

इस्राईलमधील एका वर्गाचा नेतान्याहू आणि त्यांच्या वाढत्या युद्धखोर भूमिकेला विरोध आहे. सरकारी तिजोरी, युद्धाला कंटाळलेली लोकभावना यांची तमा न बाळगता राष्ट्रभावनेचा यज्ञकुंड सुरु ठेवणाऱ्या नेतान्याहू यांची लोकप्रियता घसरत असून ते पुढील निवडणुकीत मार खातील, असे काही सर्वेक्षणांमध्ये समोर आले आहे. युद्धप्रसंग रेटून नेतान्याहू ते टाळण्याची खटपट करीत आहेत. इस्माईल हनिये हे ''हमास''च्या राजकीय फळीचे प्रमुख असले तरीही ते कट्टरवादी गटात मोडले जात नव्हते. संघर्षात ''हमास''च्या वतीने सामोपचाराची बोलणी हनिये करीत होते. या ताज्या युद्धात त्यांना स्वतःच्या तीन मुलांचा आणि चार नातवांचा बळी द्यावा लागला आहे. शांततेची बोलणी करणाऱ्यालाच मारून नेतान्याहू यांनी आपले युद्धप्रिय धोरण स्पष्ट केले आहे. अध्यक्षीय निवडणुकीचे वर्ष असणाऱ्या अमेरिकेत, व्यवस्थेच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर आपले वजन राखणाऱ्या ज्यू लोकांची नाराजी ओढवून घ्यायला नको म्हणून जो बायडेन आणि कमला हॅरिस इस्राईलची पाठ राखण करीत आहेत. मात्र, त्यामुळे नेतान्याहू यांसारख्या पुढाऱ्यांचे मनोधैर्य वाढत असून पश्चिम आशियातील परिस्थिती हाताबाहेर जात त्याची निर्नायकीकडे वाटचाल सुरु आहे.

# 'डिस्कनेक्ट' होण्याचा हक्क

बाहेरही कालवा. मनातही कालवा. बाहेरच्या कालव्यानं खोल वावरातल्या बांधावरच्या झुडपातील दिवसाच्या पावसाळी अंधारात जाऊन बसावं वाटतं. मनातल्या कालव्यानंही बाहेर फक्त श्वासापलीकडे काहीच ऐकू आलं नाही पाहिजे, या भावनेतून मनाच्या खोल कपारीत दडून बसावं वाटतं. दोन्हीकडून जरा दूर दिसणाऱ्या उजेडाच्या भिंतीतून इकडे खूप मोठ्या संख्येनं राजाचं सैन्य वेगानं येऊन आपल्याला घेऊन जाईल, असं वाटत राहतं. ही अन्य कोणासाठी गोष्टच असू शकते खरं तर! आपल्याला हे खरं खरं वाटलं तरी ती लिहून काढताना किंवा कुणाला सांगताना गोष्टच होऊन जाते. नाही का? आपल्याला जे जाणवतं प्रखरपणे, ते लिहून काढताना, किंवा कोणाला तरी सांगताना नीटनेटकं रचून सांगावं लागतं. आत उमटेल तसं विस्कळीत सांगितल्यावर सांगणाऱ्याची आणि ऐकणाऱ्याचीही गडबड होते. शेती करताना कसं सगळं क्रमाक्रमानं करावं लागतं.

तसंच मनातलं व्यक्त करताना त्याला क्रम लावावा लागतो. बरं हे सगळं करताना मनामनाचा एकूणच अथांग प्रदेश आणि त्यातील अंतराळात सुरू असलेल्या उलथापालथींकडे आपलं तटस्थ राहून लक्ष असण्याइतपत आपण 'सजग' असायला हवं, हे कळत असतं आपल्यालाष्ठ तरीही असं काय घडतं, की एका बाजूला तोल सांभाळण्याचे आटोकाट प्रयत्न करत असताना दुसऱ्या बाजूला आपलंच मन बंड पुकारत जातं? आपल्याशीच उभा दावा मांडत झगडत राहतं? जणू सर्जनशीलतेच्या प्रदेशात एखादं पिसाट ढोर घुसावं नि आपणच लिहिलेल्या कवितांची शकले करत सुटावं... हे घडतंय सतत... काहीतरी हलून गेलंय या जगाचं. समाजाचं. सतत कुणाला तरी पराभूत करायला कोणतातरी दुसरा गट सरसावू लागलाय. एका बाजूला असंख्य स्वप्नांचे प्रदेश नि दुसऱ्या बाजूला हातातून निसटून चाललेलं जगणं... हे मनातल्या,



मनाबाहेरच्या गदारोळाच्या गराड्यातील जगणं जीवनशैली म्हणून स्वीकारायला कोणी भाग पाडतंय का आपल्याला? ह्या एकूण गदारोळापासून अलिप्त होत जाणं हा एकमेव पर्याय उरलाय का? 'राईट टू डिस्कनेक्ट' किंवा 'राईट टू बी ऑफलाईन' ही नवी चळवळ उभी करायला हवी. शेतातल्या कोणत्याही झुडुपात जाऊन लिहित बसलो, तरी जग शोधून काढतं आपल्याला. आपल्याला 'डिस्कनेक्ट' व्हायचा अधिकारच या नव्या लोकशाहीत उरला नाहीये.

लोकशाही म्हणजे तरी काय? सायंकाळी आजूबाजूच्या शिवारातली माणसं सामायिक बांधावर जमली, की 'लोकशाही म्हत्वाची' असं मधूनच बोलत असतात नि शांत होतात. म्हणजे काय, विचारलं तर 'लोकशाही म्हणजे निवडणूक' या पलीकडे उत्तर येत नाही. नेमकं काय चाललंय भवताली, याची कोणालाच काहीच माहिती नसते किंवा त्यासाठी काहीही असोशी नसते. मग ते सगळे कोणाच्या तरी घरातल्या तरूण मुलामुलीच्या लग्नाच्या नियोजनाचं बोलायला लागतात. त्यावर प्रत्येकाला खूप सुचत राहतं. पत्रिका छापायच्या, की व्हॉट्सअपवरच भागवायचं, यावर चर्चा करत राहतात. लोकशाहीवर, पिकांना मिळणाऱ्या भावावर, पिकांवर पडणाऱ्या रोगावर फार बोलत नाहीत. पडणाऱ्या न पडणाऱ्या पावसावर, गावात दर आठवड्याला कोणाचा तरी मृत्यु होत राहतो, त्यावरही फार बोलत नाहीत.

कधी कधी तर नुसतीच जमतात. वर्तुळाकार बसून राहतात. एकमेकाकडे न पहाता. वाटतं यांनाही 'डिस्कनेक्ट' व्हायचंय या आजच्या गदारोळापासून. पण कसं होतात, याची माहितीच नाही त्यांच्याकडे. गप्प राहणं म्हणजे गदारोळापासून डिस्कनेक्ट होणं नाही. उलट गप्प राहिल्यावर आतला नि बाहेरचा गदारोळ कर्कश्श होत जातो. स्वत:चे विचारच शिल्लक राहात नाहीत. पण जेव्हा बोलत असतात सगळे काहीबाही, तेव्हाही कुठल्याशा भीतीपासून दूर पळण्यासाठी ते आशयविरहित असंबद्ध चर्चा करताहेत ,असं वाटत राहतं. 'यंदा मागच्यासारखा पाऊस नाही', या वाक्यावर चटकन सगळे सहमत होतात आणि जिल्ह्यात, राज्यात काही ठिकाणी खूप पडलेल्या पावसावर बोलत राहतात. सगळ्यांनी समाजमाध्यमांवर, चॅनलवर पाहिलेलं असतानाही त्या दृश्यांच्या आपल्या पद्धतीने गोष्टी रचत एकमेकांना माहीत असलेल्या या गोष्टी सांगत राहतात. मग संपलं की गप बसतात.

# अनमोल मातीची महती

एखाद्या वस्तूला मातीमोलाचा भाव मिळणे हा वाक्प्रचार आपल्या बोलण्यात अगदी सहज येतो. पण खरे तर मातीचे मोल खूप मोठे आहे. अर्थव्यवस्थेत मातीचे मूल्यांकन होत नसल्यामुळे कदाचित याचे खरे मूल्य आपल्याला जाणवत नाही. जमिनीवर सर्वत्र उपलब्ध होणारे हे संसाधन अमूल्यच. याचे कारण माती नैसर्गिक परिसंस्था आणि मानवी शेतीचा पाया आहे. पृथ्वीवर अन्न बनवण्याची क्षमता फक्त प्रकाशसंश्लेषण करणाऱ्या वनस्पतींना आहे (आणि केमोसिंथेसिस करणारे सजीव). या वनस्पतींना मातीतूनच आधार आणि पोषण मिळते. सूक्ष्मजीवांना अधिवास देऊन जैविक मालाचे विघटन करणे आणि अजैविक घटक उपलब्ध करून देणे यामुळे अन्नउत्पादन शक्य होते. मातीतून अशा अनेक पर्यावरणीय सेवा मिळतात. मातीत कार्बनयुक्त सेंद्रिय पदार्थांचा साठा असतो. त्यामुळे हे एक महत्त्वाचे कार्बन सिंक आहे. मातीमुळे नायट्रोजन, फॉस्फरस आणि इतर काही पोषणद्रव्य चक्राकार पद्धतीने वातावरणात फिरत असतात. अर्थव्यवस्थेत मातीचा मोलाचा वाटा आहे. विटा आणि



सिमेंटचा कच्चा माल मातीतूनच मिळतो आणि इमारतीचा पाया मातीचाच असतो. मातीत बुरशी, एकपेशीय वनस्पती, प्रोटोझोआ, गोलकृमि (नेमाटोड्स), गांडुमाळ, मुंग्या, गोगलगाय आणि काही सरपटणाऱ्या प्राण्यांना अधिवास आणि खाद्य मिळते. या वैविध्यपूर्ण समुदायामुळे जमनीखालच्या परिसंस्थेत गुंतागुंतीची अन्नसाखळी बनते आणि सेंद्रिय पदार्थांचे विघटन होऊन पोषणद्रव्ये प्राप्त होतात. मातीची रचना आणि आरोग्य यावर झाडांचे स्वास्थ्य अवलंबून असते. पण जागतिक हवामानबदल आणि त्यातून उद्भवणारे तीव्र तापमान, अतिवृष्टी, चक्रीवादळ यांच्या तडाख्यातून माती सुद्धा सुटत नाही. हवामानबदलाचा मातीच्या पोषणक्षमतेवर होणारा परिणाम अधिकाधिक स्पष्ट आणि चिंताजनक होत चालला आहे. हवेतील उष्णता वाढली की मातीचे तापमान वाढते आणि आर्द्रता कमी होते. अनेक अभ्यासातून असे दिसते की मातीमधील आद्रतेची पावसाळ्यात महत्त्वाची भूमिका आहे. भारताच्या जमिनीतील आर्द्रतेचे नकाशे इसरो (आयएसआरओ) प्रकाशित करतात. यात अत्यल्प आद्रता असलेल्या कोरड्या मातीचे क्षेत्र वाढत असल्याचे स्पष्ट दिसते. कोरड्या मातीवर कडक आणि अभेद्य थर तयार होतो ज्यात पाणी शिरू शकत नाही. अशा क्षेत्रात सुपीक जमीन वाळवंटीकरणाकडे जाऊ लागते.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in
ई -निविदा सुचना क्र. ६९ सन २०२३-२०२४
(शुध्दीपत्रक क्र. ०१)

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगोन कामांतर्गत घाटकोपर (प) येथील गुलिस्तान आवारातील डो इमारतींमध्ये लाद्यांचे नूतनीकरण, अंतर्गत व बाह्य सिमेंट गिलावा व रंगकाम, प्रसाधन गृहांची दुरुस्ती, दरवाजे खिडक्यांची दुरुस्ती, किचन प्लॅटफॉर्म, गळतीप्रतिबंधक उपाय योजना, ड्रेनेज लाईन दुरुस्ती, पाईप लाईन दुरुस्ती इतर अनुषंगिक बाबींची कामे करणेबाबत.. | रु.९३,५८,६७३ /- |
| २ | मुळगोण कामाअंतर्गत इमारत क्र. १४३ च्या अंतर्गत/बाह्य दुरुस्ती संरचनात्मक दुरुस्ती प्रदान करणे. | रु.८११९९३९ /- |
| ३ | मुळगोण कामाअंतर्गत इमारत क्र. १४२ च्या अंतर्गत/बाह्य दुरुस्ती संरचनात्मक दुरुस्ती प्रदान करणे. | रु.७५८८६८० /- |
| ४ | मुळगोण कामाअंतर्गत इमारत क्र. १४१ च्या अंतर्गत/बाह्य दुरुस्ती संरचनात्मक दुरुस्ती प्रदान करणे. | रु.७५८८६९०/- |
| ५ | मुळगोण कामाअंतर्गत कलानगर भवन, वांद्रे कुर्ला (पू) मुंबई येथे जॉइंट केबिन जॉइंट डायरेक्टर केबिन २, कायदा अधिकारी. ओ अँड एम एस्टॅब्लिशमेंट, पीए केबिन १ आणि २, पॅसेज एरिया डायरेक्टरेट ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टी अँड हेल्दी ५ वा मजला (भाग II) चे नूतनीकरण आणि सुधारणा करणे | रु..११४८७७३१/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.
ई- निविदा उपलब्ध कालावधी- दि. ०९.०८.२०२४ ते दि. १६.०८.२०२४ पर्यंत
ई - निविदा उघडणे - दि. १९.०८.२०२४ दुपारी १५.०० वाजता.

जा.क्र.कास/उमुंबि/निविदा/ ७५३२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :
01 AUG 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८१६

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ‘मविआच्या काळात फडणवीसांनाच नाही, तर एकनाथ शिंदेंनाही अटक करण्याचा प्रयत्न झाला’, परमबीर सिंह यांचा मोठा दावा!

**मुंबई : गणेश बागडे**

महाविकास आघाडीचे सरकार असताना मला आणि तत्कालिन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनाच नाही तर तत्कालिन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपाच्या इतर काही नेत्यांना अटक करण्यासाठीसुद्धा अनिल देशमुख यांनी दबाव आणला होता, असा दावा मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी केला आहे. एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. तसेच यासंदर्भात शरद पवार यांच्या सिल्वर ओक आणि उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवास्थानी बैठक झाली होती, असे ते म्हणाले. त्यांच्या या दाव्यानंतर पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

शरद पवार यांचे निवासस्थान असलेल्या सिल्वर ओकवर बैठक पार पडली होती. या बैठकीला शरद पवार, अनिल देशमुख, अनिल गोटे आणि पी.पी. चव्हाण उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी माझ्यावर विरोधकांवर खोटी कारवाई करण्यासंदर्भात दबाव आणला. मात्र, मी त्यांना नकार दिला. मी अशाप्रकारे कुणावरही खोटा






गुन्हा दाखल करणार नाही, असं स्पष्टपणे सांगितले, असं परमबीर सिंह म्हणाले. ‘सिल्वर ओकवरील बैठकीनंतर उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानीदेखील एक बैठक घेण्यात आली होती. या बैठकीलासुद्धा अनिल देशमुख उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी मुंबई बँक प्रकरणात प्रवीण दरेकर यांना अटक करण्यासाठी माझ्यावर दबाव आणला. तेव्हाही मी त्यांना सांगितले की याप्रकरणाची चौकशी झाली असून ही केस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे मी पुन्हा कोणावरही कारवाई करणार नाही’, असंही त्यांनी सांगितले.

‘महाविकास आघाडी सरकारने माझ्याविरोधात खोट्या केसेस दाखल करून मला अटक करण्याचा प्रयत्न केला. इतकच त्यांनी तर त्यांनी ठाण्यातील एका जुन्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात तत्कालिन विरोधी पक्षनेते आणि आताचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही अटक करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणाची चौकशी तेव्हाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सरदार पाटील यांनी केली होती. त्यांना थेट संजय पांडे यांच्याकडून निर्देश मिळत होते. तर संजय पांडे यांना अनिल देशमुख, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून निर्देश दिले जात होते. त्याप्रकरणात केवळ मलाच नाही तर देवेंद्र फडणवीस यांना अटक करण्याचा प्रयत्न झाला’, असेही त्यांनी सांगितले.

# म्हाडाची अल्प गटात महागडी घरे, वरळीतील सदनिका २.६२ कोटींची; मासिक उत्पन्नाची मर्यादा ७५ हजार रुपये

**मुंबई : यश सावंत**

म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या सप्टेंबर २०२४च्या सोडतीतील घरांच्या किमती नेहमीप्रमाणे याही वर्षी चढ्या आहेत. मात्र यावेळी अल्प गटातील घरांच्या किमतीने कोटींचा पल्ला पार केला आहे. वरळीतील अल्प गटातील घराची किंमत चक्क दोन कोटी ६२ लाख १५ हजार ५३९ रुपये आहे. महिना ७५ हजार रुपये उत्पन्न असणाऱ्यांना हे घर कसे परवडणार, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. तर मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाला मिळालेल्या घरांच्या किमती अवाच्या सवा आहेत. त्यामुळे ही घरे सर्वसामान्य विजेत्यांना परवडणारी नाहीत. मुंबई मंडळाच्या २०३० घरांच्या सोडतीसाठी शुक्रवारपासून अर्ज विक्री – स्वीकृती प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया ४ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. तर १३ सप्टेंबरला सोडतीचा निकाल जाहीर




होणार आहे. मुंबईत म्हाडाची घरे ही अत्यल्प आणि अल्प गटासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. दोन्ही गटातील इच्छुक सोडतीकडे डोळे लावून होते. पण आज अर्ज विक्री – स्वीकृतीस सुरुवात झाल्यानंतर मात्र किंमत पाहूनच त्यांची मोठी निराशा झाली. वडाळा आणि इतर ठिकाणची अल्प गटातील घरेही दीड ते दोन कोटींच्या घरातील आहेत. नऊ लाख रुपये असे वार्षिक (दरमहा ७५ हजार रुपये) कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या अर्जदारांना वा पुढे विजेत्यांना ही घरे कशी परवडणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, दुरुस्ती मंडळाकडून या सोडतीसाठी शहरातील ८९ घरे उपलब्ध झाली आहेत. मागील सोडतीत ही काही घरे दुरुस्ती मंडळाकडून उपलब्ध झाली होती. त्यावेळी या घरांच्या किमती भरमसाट होत्या. ताडदेवमधील सात घरे चक्क साडेसात कोटी रुपयांची होती.

# घाटकोपर फलक दुर्घटना : आरोपी भावेश भिंडेची अटक कायदेशीरच, उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**मुंबई : सम्यक कासारे**

घाटकोपर येथील महाकाय फलक दुर्घटनेप्रकरणी इगो मीडियाचा मालक भावेश भिंडे याला करण्यात आलेली अटक कायदेशीरच असल्याचे उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. तसेच, अटक बेकायदा ठरवून तातडीने जामिनावर सुटका करण्याचे आदेश द्यावेत या मागणीसाठी भिंडे याने केलेली याचिका न्यायालयाने फेटाळली. भिंडे याला अटक करताना योग्य कायदेशीर प्रक्रिया राबवण्यात आली. ती बेकायदा असल्याचे किंवा त्यात काही त्रुटी असल्याचे आम्हाला आढळून आले नाही. त्यामुळे, आपल्याला बेकायदेशीर पद्धतीने ताब्यात ठेवल्याचा भिंडे याचा आरोप चुकीचा आहे, अशी टिप्पणी न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने उपरोक्त निर्णय देताना केली. खंडपीठाने भिंडे याच्या याचिकेवर बुधवारी सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर या प्रकरणी शुक्रवारी निर्णय देण्याचे स्पष्ट केले होते. फलक दुर्घटना हे



प्राक्तन होते. त्यासाठी आपल्याला जबाबदार धरले जाऊ शकत नाही, असा दावा करून भिंडे याने आधी जामिनाची मागणी केली होती. त्यानंतर, त्याने आपल्याला बेकायदेशीररीत्या ताब्यात ठेवण्यात आले होते, असा दावा करून अटक बेकायदा ठरवण्याची आणि तातडीने जामिनावर सुटका करण्याची मागणी केली होती. दुसरीकडे, भिंडे हा पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी ओळख बदलून राजस्थानमधील उदयपूर येथे वेगवेगळ्या हॉटेलमध्ये वास्तव्य करत होता.

# गोविंदा अद्याप विम्यापासून वंचित, विमा संरक्षणावरून दोन संस्थांमध्ये वादाची हंडी

**मुंबई : नितीन देवळेकर**

गोपाळकाला उत्सव अवघ्या १८ दिवसांवर आला असून अद्याप गोविंदांना विम्याचे कवच मिळू शकलेले नाही. तसेच दोन महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या नव्या संस्थेवर विम्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून यावरूनच गोविंदा पथके आणि गोविंदा संतप्त झाले आहेत. विमा संरक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आलेल्या ‘महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन’ या संस्थेवर दहीहंडी असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) या संस्थेने आक्षेप घेतला असून सदर संस्थेची नोंदणी रद्द करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे यंदा समन्वयाची दहीहंडी फुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गोपाळकाला उत्सवाला अवघे काही दिवस उरले असून सर्वत्र जोरदारपणे मानवी मनोरे रचण्याचा सराव सुरू आहे. मात्र सराव आणि प्रत्यक्ष गोपाळकाला उत्सवाच्या दिवशी गोविंदांना दुखापत होण्याचीही शक्यता असते. थर रचताना पडून गोविंदाचा मृत्यू झाल्यास अथवा गंभीर जखमी झाल्यास संबंधित गोविंदाच्या कुटुंबियांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागते. त्यामुळे २०२३ प्रमाणे २०२४ मध्येही दहीहंडी दरम्यान मानवी मनोरे रचणाऱ्या राज्यातील ७५ हजार गोविंदांना विमा संरक्षण देण्याचा ‘शासन निर्णय’ राज्याच्या क्रीडा विभागातर्फे २५ जुलै २०२४ रोजी घेण्यात आला आहे. तसेच कमीत कमी हप्ता असणाऱ्या कंपनीची निवड केल्यानंतर आवश्यक असणारी विमा हप्त्यासाठीची रक्कम शासन मान्यतेनंतर ‘महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन’ या संस्थेस अदा



करण्यात यावी, असेही या शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

गोविंदांना विमा संरक्षणाची जबाबदारी देण्यात आलेली महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन ही संस्था धर्मादाय आयुक्तांकडे चुकीच्या पद्धतीने नोंदणीकृत झाली आहे. त्यामुळे या संस्थेची नोंदणी रद्द करण्यात यावी, अशी मागणी ‘दहीहंडी असोसिएशन’ (महाराष्ट्र राज्य) या संस्थेने केली आहे. विमा संरक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली संस्था कधी व केव्हा स्थापन करण्यात आली, याबाबत गोविंदा पथकांना माहिती नाही. चुकीच्या पद्धतीने स्थापन करण्यात आलेल्या या संस्थेबाबत गोविंदा पथकांकडून वारंवार धर्मादाय आयुक्तांकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे या संस्थेची नोंदणी रद्द न केल्यास येत्या दोन ते तीन दिवसांत वरळीतील धर्मादाय आयुक्त कार्यालयाला घेराव घालू आणि आंदोलन करू. तसेच गरज पडल्यास न्यायालयातही जाऊ, असा इशारा दहीहंडी असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) या संस्थेने दिला आहे. यासंदर्भात मुंबईत शुक्रवार, ९ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली.

‘गेल्यावर्षी महाराष्ट्र शासनाने तब्बल ८१ हजार गोविंदांना मोफत विमा संरक्षण दिले. हे विमा संरक्षण गोविंदांना मिळवून देण्यासाठी २०२३ साली स्थापन झालेल्या आमच्या दहीहंडी असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) या संस्थेने तळागाळात जाऊन काम केले. मात्र, दहीहंडी उत्सवाला अवघे काही दिवस उरलेले असताना अद्यापही गोविंदांना विमा संरक्षण मिळालेले नाही, ही चिंतेची बाब आहे.

# वातानुकूलीत बसला उंच गतिरोधकांचा अडथळा, सर्वेक्षण करण्याचा बेस्टचा निर्णय

**मुंबई : विशाल कारंडे**

ठिकठिकाणच्या उंच गतिरोधकामुळे नवीन विद्युत वातानुकूलित दुमजली बसचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे उंच गतिरोधकांमुळे चालकांना होणारा त्रास आणि बेस्ट बसचे होणारे नुकसान टाळण्यासाठी बेस्ट उपक्रम सर्वेक्षण करणार आहे. बेस्ट मार्गाची पाहणी करून लवकरच अहवाल तयार केला जाणार आहे. मुंबईतील अनधिकृत आणि चुकीच्या पध्दतीने बांधण्यात आलेल्या गतिरोधकांची संख्या अधिक आहे. या गतिरोधकामुळे वाहनचालकांना वाहन चालवणे अवघड होते. तसेच अशा गतिरोधकामुळे वाहतूक कोंडी होते. यासह अनेक वेळा अपघात होतात. त्याचप्रमाणे बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात विद्युत वातानुकूलित दुमजली बसाचे उंचा गतिरोधकामुळे नुकसान होते. बसचा खालील भाग आणि रस्त्यामधील उंचीचे अंतर कमी असल्याने उंच गतिरोधकावरून या बस जाताना खालून घासल्या जातात. चालकांनी गतिरोधकावरून वेगात बसगाडी नेल्यामुळे प्रवाशांना दुखापत झाल्याची घडना घडली आहे. त्यामुळे गतिरोधकावरून बस चालवणे चालकांसाठी अवघड झाले आहे. परिणामी, बेस्ट प्रशासन याबाबत सर्वेक्षण करणार आहे. विद्युत वातानुकूलित दुमजली बस धावत असलेल्या मार्गावरील उंच गतिरोधकाची पाहणी करणार आहेत. त्यानंतर संबंधित विभागाला कळवून पुढील कार्यवाही केली जाईल, असे बेस्ट उपक्रमातील अधिकाऱ्याने सांगितले.



बेस्ट उपक्रमातील जुन्या दुमजली बसची बांधणी उत्तम प्रकारची होती. प्रवाशांना उभे राहण्यास जागा होती. मात्र नवीन विद्युत वातानुकूलित दुमजली बसची बांधणी प्रवाशांसाठी गैरसोयीची आहे. जुन्या बसची उंची १४.५ मीटर होती, तर नवीन बसची उंची १६ मीटर आहे. जुन्या बसपेक्षा नवीन बसची उंची अधिक असल्याने नवीन बसचे अनेक मार्ग बदलले आहेत. तसेच या बसचा ग्राउंड क्लीयरन्स जास्त असल्याने उंच गतिरोधकांमुळे कोट्यवधी रुपयांच्या बसचे नुकसान होत आहे.

# पालिकेत अपुरे मनुष्यबळ, सचिव विभागात निम्म्याहून अधिक लिपिक पदे रिक्त

**मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मुंबई महानगरपालिकेच्या सचिव विभागात लिपिकांची ६८ पैकी तब्बल ५५ पदे रिक्त असून सध्यस्थितीत केवळ १३ लिपिक कार्यरत आहेत. अनेक वर्ष उलटल्यानंतरही महानगरपालिका प्रशासनाला लिपिक पदावरील भरतीसाठी मुहूर्त मिळालेला नाही. या विभागातील लिपिकांना बढती मिळाली असून विभागात पुरेसे लिपिक नसल्याने बढती मिळालेल्या अनेकांना लिपिक म्हणूनच काम करावे लागत आहे. तसेच, अपुऱ्या मनुष्यबळामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण पडत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष धगधगत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेच्या सचिव विभागात लिपिक पदाची भरती प्रक्रिया झालेली नाही. सचिव कार्यालयातील जवळपास ४९ लिपिकांनी पदोन्नतीसाठी २०२२ मध्ये परीक्षा दिली. त्या परीक्षेत एकूण ३१ लिपिक उत्तीर्ण झाले. विविध निकष आणि कौशल्याच्या आधारे त्यांची कनिष्ठ, वरिष्ठ सचिवीय सहाय्यक या पदावर पदोन्नती झाली. सचिव कार्यालयात लिपिक पदाची एकूण ६८ पदे आहेत. त्यापैकी तब्बल ५५ पदे रिक्त आहेत. कार्यालयातील ३१ लिपिकांना वरिष्ठ सचिवीय सहाय्यक, तर २४ लिपिकांना कनिष्ठ सचिवीय सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळाली आहे. मात्र, कार्यालयात पुरेसे लिपिक उपलब्ध नसल्याने पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ पदावरील काम करावे लागत आहे. पदोन्नती मिळूनही




पदभार हाती न आल्याने कर्मचाऱ्यांचे मनोबल खचले आहे. तसेच, या कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. पालिकेच्या सचिव विभागातील अनागोंदी कारभारामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. पालिकेत आता प्रशासकीय राजवट असल्यामुळे पालिकेतील विविध समितींच्या बैठका होत नाहीत. मात्र, पालिका निवडणुकीनंतर प्रशासकीय राजवट हटविण्यात आली, तर उपलब्ध लिपिकांवर कामाचा प्रचंड ताण येण्याची शक्यता आहे. तसेच, कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भातील प्रक्रिया सुरू असून आयुक्तांची परवानगी मिळताच तात्काळ बदली केली जाईल, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

महानगरपालिकेच्या सचिव विभागात लिपिक पदासाठी शेवटची भरती २०१५ साली तत्कालीन महानगरपालिका सचिव नारायण पठाडे यांच्या कार्यकाळात करण्यात आली होती. एकूण १२ जागांसाठी त्यावेळी जाहिरात काढण्यात आली होती. त्यावेळी कनिष्ठ सचिवीय सहाय्यक (मराठी) संवर्गात एकूण ३६ पदे होती. त्यापैकी एकूण २९ पदे रिक्त होती. दरम्यान, कनिष्ठ सचिवीय सहाय्यक संवर्गातील २९ रिक्त पदे लिपिक संवर्गात रूपांतरित करण्यात आली. त्यानंतर १२ व २९ अशी मिळून एकूण ४१ लिपिक पदे त्यावेळी भरण्यात आली होती. त्यानंतर आतापर्यंत जवळपास ८ वर्षांचा कालावधी लोटला, तरीही लिपिक पदाची भरती प्रक्रिया झालेली नाही.

---

महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in ☎ ४१३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२

जा.क्र.का.अ./मर्मुवि/ई-निविदा/ ४६३० दिनांक :- ०६/०८/२०२४

**निविदा सूचना ०४ (चार) (सन २०२४-२५)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९८२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता “बी-१” नमुन्यातील निविदा मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. २२, २३ व २४ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५१ |
| २ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. २५,२६ व २७ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.५३ |
| ३ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. २८ व २९ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ५.०१ |
| ४ | वरळी येथील जांभोरी मैदानाची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.९३ |
| ५ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ४१,४२ व ४३ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.३४ |
| ६ | वरळी येथील बी.डी.डी. चाळ क्र. ४४, ४५ व ४६ ची साफसफाई करणे व स्वच्छता सामग्री पुरविणे. (मे २०२४ ते एप्रिल २०२५) | ७.३४ |
| ७ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील एल-ए-1 इमारतीच्या मुख्य लाकडी जिन्याची दुरुस्ती, सिमेंट गिलावा व रंगकाम करणे. | ८.४१ |
| ८ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील 3 पोलीस अधिकारी इमारतीतील खोली क्र.-2 चे सिमेंट गिलावा व रंगकाम करणे. | ७.०३ |
| ९ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील नवीन पोलीस वसाहतीतील इमारत क्र. "ई" च्या समोरील मोकळ्या जागेत स्टॅम्प कॉंक्रीट करणे. | ७.७६ |
| १० | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील नवीन पोलीस वसाहतीतील इमारत क्र. "जी" च्या समोरील मोकळ्या जागेत स्टॅम्प कॉंक्रीट करणे. | ७.७४ |
| ११ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील नवीन पोलीस वसाहतीतील इमारत क्र. "एच" च्या समोरील मोकळ्या जागेत स्टॅम्प कॉंक्रीट करणे. | ७.७४ |
| १२ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील नवीन पोलीस वसाहतीतील इमारत क्र. "डी" च्या समोरील मोकळ्या जागेत स्टॅम्प कॉंक्रीट करणे. | ७.६९ |
| १३ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील नवीन पोलीस वसाहतीतील इमारत क्र. "बी" च्या समोरील मोकळ्या जागेत स्टॅम्प कॉंक्रीट करणे. | ७.३० |
| १४ | मूळगौण कामांतर्गत नायगांव, परेल येथील 3 जमादार इमारतीतील मुख्य जिन्याची दुरुस्ती, सिमेंट गिलावा व रंगकाम करणे. | ५.४४ |
| १५ | मूळगौण कामांतर्गत नायगांव, भोईवाडा परेल येथील लॉकअप इमारतीतील जलवाहिनीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ८.४१ |
| १६ | मूळगौण कामांतर्गत नायगांव येथील एल-ए-1 कार्यालयाच्या आवारातील क्रिडा अधिकारी यांच्या दालनाचे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | ६.११ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दि.०९/०८/२०२४, सकाळी १५.०० पासून ते दि.१५/०८/२०२४ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दि.१९/०८/२०२४ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, |

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८८०

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in
**व्दीतीय मागणी ई -निविदा सुचना क्र. ७५ सन २०२३-२०२४**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत एसआरपिएफ गट ८ युनिट २३ गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे ४ रुम चाळ मध्ये (जि.आय शीट/ए.सी. शीट प्रदान करणे आणि निश्चित करणे) | रु. १००२५०९/- |
| २ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत एसआरपिएफ गट ८ युनिट २४ गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे ४ रुम चाळ मध्ये (जि.आय शीट/ए.सी. शीट प्रदान करणे आणि निश्चित करणे) | रु. ११०५४०२/- |
| ३ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत प्रकार -२ २२४ पोलिस वसाहत एस.आर.पी.एफ गट-८, गोरेगाव (पू) इमारत क्रमांक ३६ ड, मुंबई येथे (प्लास्टर पेंटिंग, दरवाजे खिडक्या आणि इतर कामे प्रदान करणे आणि लागू करणे.) | रु. ९८१४३२/- |
| ४ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत प्रकार -II ३२ पोलिस वसाहत एस.आर.पी.एफ गट-VIII, गोरेगाव (पू) इमारत क्रमांक ३५ अ , मुंबई येथे (प्लास्टर पेंटिंग, दरवाजे खिडक्या आणि इतर कामे प्रदान करणे आणि लागू करणे.) | रु. ११२२६७०/- |
| ५ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत एस.आर.पी.एफ गट ८ गोरेगाव पूर्व. (दक्षिण तारखेपासून सा.बां. चौकीपर्यंत नवीन रस्त्याची दुरुस्ती व नूतनीकरण) | रु. २४३२९८३/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.

ई- निविदा उपलब्ध कालावधी- **दि. ०६.०८.२०२४ ते दि. १३.०८.२०२४ पर्यंत**

ई - निविदा उघडणे - **दि. १४.०८.२०२४ दुपारी १५.०० वाजता.**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७८४८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :- [illegible] 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१६६३

# मर्द असते तर समोर आले असते, हल्ला करून पळून का गेले? ठाकरे गटाचे राजन विचारे यांची मनसेवर टीका

■ ठाणे : तृप्ती गोरे

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर शनिवारी ठाण्यात मनसेच्या कार्यकर्त्यांनी नारळ फेकून हल्ला केला. तसेच गडकरी रंगायतन परिसरात त्यांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न झाला. या घटनेनंतर ठाण्यात ठाकरे गटाकडून संताप व्यक्त केला जात आहे. महिलांना पुढे करून हा प्रकार झाला आहे. मर्द असता तर समोर आला असतात. पळून कशाला गेलात, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते राजन विचारे यांनी केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे शनिवारी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे आले होते. यावेळी नितीन कंपनी भागात मनसेच्या काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या ताफ्याच्या दिशेने नारळ फेकले होते. या हल्ल्यात ताफ्यातील एका वाहनाच्या काचा फुटल्या आहेत. तसेच गडकरी रंगायतन परिसरात उद्धव ठाकरे यांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न मनसेच्या महिला कार्यकर्त्यांनी केला.



या हल्ल्यानंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. रात्री उशीरा ठाकरे गटाचे नेते माजी खासदार राजन विचारे, ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी पत्रकार परिषद घेतली. तसेच मनसेच्या या प्रकाराविषयी संताप व्यक्त केला. महिलांना पुढे करून हा प्रकार झाला आहे. मर्द असता तर समोर आला असतात. पळून कशाला गेलात. गडकरी रंगायतनमध्ये दोन ते तीन हजार शिवसैनिक होते. हे शिवसैनिक खाली उतरले असते तर वेगळ काही घडल असतं, शिवसैनिकांवर हल्ले करण्याची भाषा करू नका, असे राजन विचारे म्हणाले. लहान मुले सुद्धा दगडफेक करून पळून जातात. तसाच हा प्रकार आहे. ही मर्दाची लक्षणे नाहीत. नारळ फेकण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर हे तिथून जीवघेत पळत सुटले अशी टीका विचारे यांनी केली.

ही घटना अत्यंत निंदनीय आहे. स्टंट करण्यासाठी, पक्षासाठी काही तरी करतोय हे दाखविण्यासाठी असले प्रकार करण्यात आले आहेत. नारळ फेक करताना सर्वसामान्य नागरिक ये-जा करत होते.

# महिलांनी दीड हजारात विकले जायचे की नाही, हे ठरवावे - उद्धव ठाकरे

■ ठाणे : विशेष प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून १५०० रुपयांची लाच देऊन हे सरकार तुम्हाला विकत घेऊ पाहत आहेत. पण आपण विकले जायचे की नाही, हे महिलांनी ठरवावे, असा सल्ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी ठाण्यातील सभेत बोलताना दिला. राज्य लुटणाऱ्या दरोडेखोरांना सत्ता आल्यावर तुरुंगात पाठविणार असल्याचा इशाराही देत विधानसभेची निवडणूकित आपली लढाई महाराष्ट्र द्वेष्टेबरोबर होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ठाणे येथील गडकरी रंगायतन नाट्यगृहामध्ये उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा शनिवारी पार पडली. पक्षाच्या भगवा सप्ताह निमित्ताने ही सभा आयोजित करण्यात आली होती. कितीही पैसे दिले तरी तुमची भीक आम्हाला नको हे महिलांनी आता ठरवायला हवे कारण पंधराशे रुपयांची लाच देऊन हे तुम्हाला विकत घेऊ पाहत आहे आणि महाराष्ट्राला



लुटायला आले आहेत त्यामुळे आपण विकले जायचे की नाही हे ठरवायला हवे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

शिंदे सरकार केवळ घोषणा देत आहेत पण, अंमलबजावणीचा दुष्काळ आहे. त्यामुळे घोषणा देऊन निवडणूक जिंकता येत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला. पैसे देऊन भाज्या विकत घेता येतात पण, मते विकत घेता येत नाही. लोकसभेत विजय दिसत नाही म्हणून त्यांनी लबाडी केली. मुंबईत ४८ मतांनी आपला पराभव होऊ शकत नाही, त्यामुळे कीर्तिकर यांची जागा चोरली, असा आरोपही त्यांनी केला. तीन महिने थांबा, तुमच्या मित्रपरिवाराचा घोटाळा उघडा केल्याशिवाय राहणार नाही तसेच तुमचे आणि सरकारी कलेक्टर यांना तुरुंगात गज बघायला पाठवू, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

राज्याचे मंत्रालय मुंबईत हवे की अहमदाबाद की दिल्लीतून हवे आहे, अशी विचारणा करत मुख्यमंत्री शिंदे यांचा उल्लेख दुतोंडी मांडूळ असा केला. संजय राऊत हे नमक हराम २ चित्रपट काढणार असून त्याची आम्हाला उत्सुकता आहे, असेही ते म्हणाले. तू राहशील नाही तर मी राहील, असा पुनरुच्चार करत तू म्हणजे राज्य लुटणारे आणि त्याचे पाय चालणार मांडूळ असेही ते म्हणाले. नोव्हेंबर महिन्यात निवडणूक घ्यायचे मनसुबे सुरू आहेत. जेणेकरून लाडकी योजनेचे तीन ते चार महिन्याचे पैसे महिलांना मिळतील. परंतु हे फसवा फसवीचे धंदे आहेत. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही अशीच योजना आणली होती, असे सांगत त्याचे उदाहरणही त्यांनी यावेळी दिले. भगवा झेंड्यावर चिन्ह नको, कारण शिवाजी महाराजांचा एकच भगवा झेंडा आहे. अपात्रतेचा निकाल लागेल तेव्हा लागेल, परंतु निवडणूका आल्यामुळे मशाल चिन्ह घरोघरी पोहचवा. लोकशाहीची हत्या करणाऱ्याची बुड जळणारी ही मशाल आहे, असेही ते म्हणाले.

# मेट्रोच्या कामामुळे घोडबंदर भागात अवजड वाहनांना बंदी

■ ठाणे : तृप्ती गोरे

घोडबंदर येथील कासारवडवली भागात मेट्रो मार्गिकेवर तुळई बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी घोडबंदर मार्गावर वाहतूक बदल पोलिसांनी लागू केले असून यानुसार, ११ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत रात्री १२ ते पहाटे ४ यावेळेत अवजड वाहनांना घोडबंदर मार्गावर प्रवेश बंदी असणार आहे. ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. घोडबंदर मार्गावरुन मोठ्याप्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक सुरु असते. या मार्गावर मेट्रो मार्गिका ४ चे काम सुरु आहे. या कामामुळे घोडबंदर गायमुख घाटात वाहतूक कोंडी होत असते. या मेट्रो मार्गिका ४ चे नागलाबंदर सिग्नल ते इंडियन ऑईल



पंप दरम्यान आय आणि यू आकारातील तुळई टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे कोणताही अपघात घडू नये यासाठी वाहतूक पोलिसांनी घोडबंदर मार्गावर वाहतूक बदल लागू केले आहेत.

या कामादरम्यान घोडबंदरकडे जाणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना पिलर क्रमांक ८५ जवळ प्रवेश बंदी असणार आहे. ही वाहने ठाणे वजनकाटा जवळून सेवारस्ता मार्गे पुढे इंडियन ऑईल पंपासमोर मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील. हे वाहतूक बदल ११ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत रात्री १२ ते पहाटे ४ वाजेपर्यंत लागू राहतील, अशी माहिती वाहतूक विभागाकडून देण्यात आली.

# वसईत १२ ऐवजी ७ उड्डाणपूल होणार, सर्वेक्षणानंतर रचनेत बदल, ३ पूल एकमेकांना जोडणार

■ वसई : सुचिता देशमुख

शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ उड्डाणपुलांच्या रचनेत आता बदल करण्यात आला आहे. सलग वाहतूक करता यावी यासाठी १२ पैकी



३ उड्डाणपूल एकमेकांना जोडण्यात येणार असून उर्वरित २ उड्डाणपूल आता रेल्वे उड्डाणपुलात रुपांतरीत केले जाणार आहे. यामुळे १२ उड्डाणपुलांऐवजी शहरात ७ उड्डाणपूल होणार आहेत. वसई विरार शहराची लोकसंख्या वाढत असून नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. शहरातील रस्ते अरुंद असून त्यावर वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शहरात अंतर्गत वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी १२ उड्डाणपुलांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. पहिला प्रस्ताव २०१४-१५ मध्ये देण्यात आला होता. तेव्हा या १२ उड्डाणपुलांसाठी अडीचशे कोटींचा खर्च अपेक्षित होता. नुकतीच एमएमआरडीएने शहरातील विस्तारीत पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्ते आणि उ्डाणपुलांसाठी २ हजार ३२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली होती.

# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही पालघर जिल्ह्यातील आदिवासींचा मूलभूत हक्कांसाठी संघर्ष सुरूच

■ वसई : सतिश सोनावणे

स्वातंत्र्याची ७५ वर्षे उलटून गेली तरीही पालघर जिल्ह्यासह अन्य भागातील आदिवासींच्या समस्या अजूनही सुटल्या नाहीत. घरकुल योजना, स्थलांतर, आवश्यक कागदपत्रे, वनपट्टे, पायाभूत सुविधा अशा विविध अडचणींना त्यांना समोर जावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पालघर जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. या भागात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव राहत आहेत. या भागातील नागरिकांना ज्या भागात राहत आहेत त्या भागात त्या ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने अजूनही त्यांना ग्रामीण भागाकडून शहरी भागात स्थलांतर करून मोलमजुरी, वेठबिगारी अशी कामे करावी लागत आहेत. काही वेळा वेठबिगार म्हणून छळवणूकही होत असल्याचे प्रकार समोर आले होते. रोजगारासाठी आदिवासींच्या स्थलांतरामुळे पायाभूत सुविधा, दैनंदिन जीवनमान, मुलांचे शिक्षण, पोषण आहार यासह इतर बाबींपासून आजही वंचित राहावे लागते, अशी परिस्थिती जिल्ह्यात दिसून येत आहे. याशिवाय शासनाच्या योजना आहेत त्याही योग्यरित्या त्यांच्यापर्यंत पोहोचल्या जात नाहीत असे श्रमजीवी संघटनेचे गणेश उंबरसाडा यांनी सांगितले आहे. आदिवासी कातकरी समाजातील अनेक कुटुंबांकडे स्वत:च्या मालकीची जागा नसल्याने घरकुल योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी येत आहेत. याशिवाय त्यांच्याकडे आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचे दाखले, जॉब कार्ड असे मूलभूत कागदपत्रे



नसल्याने शासनाच्या योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी मागणी विविध आदिवासी संघटनांकडून करण्यात येत आहे. पायाभूत सुविधा नसल्याने नुकताच वसईच्या वाघोली येथील आदिवासी पाड्यात रस्त्याअभावी मृतदेह अंत्ययात्रा चादरीची झोळी करून न्यावी लागली होती. पाणी, रस्ते, वीज, अशा अनेक समस्या अजूनही आदिवासी बांधवांना भेडसावत आहेत.

राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासीची लोकसंख्या १५ लाख १० हजार २१३ इतकी असून वर्ष २०२३-२४ मध्ये राज्याच्या एकूण अर्थसंकल्पात विभागाचा वाटा केवळ २.८७ टक्के इतका आहे. अर्थसंकल्पात तरतूद तर केली जाते मात्र प्रत्यक्षात खर्चात मोठी घट होत असल्याचे समर्थन अध्ययन यांच्या अवलोकनातून पुढे आले आहे. आदिवासी क्षेत्रातील बेरोजगारी, कुपोषण व दारिद्र्य वाढण्यामागे शासनाची उदासीनता दिसून येते. सातत्याने अर्थसंकल्पीत रकमेपेक्षा कमी निधी उपलब्ध होत आहे.

आदिवासींना घरकुल बांधण्यासाठी शबरी घरकुल योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला १.३० ते १.४४ हजार एवढे अर्थसहाय्य मिळते. परंतु एवढ्या तुटपुंज्या अनुदानात व वाढत्या महागाई निर्देशांकानुसार आदिवासी लाभार्थीचे घर बांधून पूर्ण होऊ शकत नाही.

# सुरुंग स्फोटांना ग्रामस्थांचा विरोध, पोलिसांच्या मध्यस्थीनंतर नवी मुंबई विमानतळ प्रकल्पात ४०० सुरुंग स्फोटांचे नियोजन

■ पनवेल: सचिन कदम

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी धडाधड झालेल्या सुरुंग स्फोटांमुळे ग्रामस्थांनी स्फोटांचे काम रोखून धरले. ही बाब सिडको मंडळ व अदानी समूहाच्या अधिकाऱ्यांनी पनवेल शहर पोलिसांच्या ध्यानात आणून दिल्यावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी संतापलेल्या ग्रामस्थ आणि प्रकल्प अधिकारी यांच्यात संवाद घडवून आणला. त्यानंतर त्याच बैठकीत स्फोटांचे नियोजन आखून दिल्याने काम पुन्हा सुरू करण्यात आले.

काही दिवसांत शेवटचे ४०० स्फोट करायचे असल्याने दररोज सकाळी २५ व सायंकाळी २५ असे ४०० सुरुंग स्फोट करण्याचे ठरल्यानंतर ग्रामस्थ शांत झाले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ



प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील वर्षी मार्च अखेरपर्यंत विमानतळावरून पहिले विमानउड्डाण होण्यासाठी सिडको मंडळ व अदानी समूह दिवसरात्र काम करत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत ओवळे गावातील काही ग्रामस्थांनी त्यांच्या हक्काचे भूखंड न मिळाल्याने त्यांनी घरे रिकामी केले नसल्याने काही कुटुंबे अजूनही त्याच ठिकाणी राहतात. ग्रामस्थांना मिळणारे भूखंड त्यांच्या सोयीनुसार ताब्यात द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती. त्यामुळे काही ग्रामस्थांना प्रकल्पाच्या नुकसानीपोटी मिळणारे भूखंड अजूनही मिळू शकले नाहीत. त्यामुळे विमानतळ प्रकल्पापासून हाकेच्या अंतरावर सुरुंग स्फोटाचे हादरे बसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# नवी मुंबईतही मालमत्ता करमाफी! शहरातील पाचशे चौरस फुटांपर्यंतची घरे असणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

मुंबई महापालिकेपाठोपाठ नवी मुंबईतील ५०० चौरस फुटांच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याची मागणी आमदार गणेश नाईक यांनी सातत्याने



लावून धरली असून गुरुवारी सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्र्यांनी याबाबत त्यांना आश्वासित केले. त्याबाबतचे आदेश दिल्याने नवी मुंबईतील लाखो नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशामुळे नवी मुंबईतील लाखो नागरिकांना फायदा होणार आहे. शहरातील जवळजवळ दोन लाख घरे ही ५०० चौरस फुटांपर्यंतची असून त्यांच्या मालमत्ता करापोटी मिळणाऱ्या अंदाजे २५ कोटींच्या रकमेचा फरक पडणार आहे. नवी मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक दिलासा देण्यासाठी मालमत्ता करमाफी आणि मालमत्ता कर सवलतीचा ठराव १९ जुलै २०१९ रोजी नवी मुंबई महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केला होता. याअंतर्गत ५०० चौरस फूट क्षेत्रफळापर्यंतच्या घरांना संपूर्ण मालमत्ता कर माफी देण्याचा निर्णय झाला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत गुरुवारी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी याबाबतचा निर्णय घेतला असून तात्काळ अंमलबजावणीचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या लाखो नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे.

# वसईत राष्ट्रीय महामार्गावर मानवी साखळी आंदोलन, रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याने संताप

■ वसई : सुचिता देशमुख

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर काँक्रिटिकरणाचे निकृष्ट दर्जाचे काम व रस्त्यांची झालेली दुरवस्था याबाबत संतप्त झालेल्या नागरिकांनी रविवारी सकाळी महामार्गावर मानवी साखळी आंदोलन केले. वसई फाटा ते चिंचोटीपर्यंत सुमारे एक हजार नागरिक या मानवी साखळीत सहभागी झाले होते. वसई पूर्वेच्या भागातून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या राष्ट्रीय महामार्गावर प्राधिकरणाने काँक्रिटिकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र करण्यात येत असलेले काँक्रिटिकरणाचे काम अतिशय निकृष्ट व नियोजन शून्य पद्धतीने केले जात असल्याने



येथून प्रवास करणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडी, अपघात यासह अन्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

सातत्याने तक्रारी करून व महामार्ग प्राधिकरण जागे होत नसल्याने वसईतील एन एच ४८ ॲक्शन काउन्सिल या सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी रविवारी राष्ट्रीय महामार्गावर मानवी साखळी आंदोलन केले. वसई फाटा ते चिंचोटीपर्यंत हजारो नागरिक मानवी साखळी करून हातात महामार्ग प्राधिकरणाचा निषेध व मागण्या फलक घेऊन उभे होते. महामार्गावरील काम पहाता त्याची दयनीय अवस्था झाली आहे. याचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिक यासह वसई विरारच्या औद्योगिक क्षेत्रालाही बसत आहे. याशिवाय अपघाताच्या घटनाही घडत आहेत. महामार्ग प्राधिकरणाने वसई विरार कार्यक्षेत्रात जे काँक्रिटिकरणाचे काम केले आहे ते खूप निकृष्ट दर्जाचे आहे. जर असे काम असेल तर रस्ते टिकणार तरी कसे असा प्रश्न आंदोलकांनी उपस्थित केला आहे. रस्त्यावरील खड्डे व काँक्रिटिकरणाचे काम प्राधिकरणाने योग्यरित्या करावे अशी आमची मागणी असल्याचे एन एच ४८ ॲक्शन काउन्सिल या सामाजिक संस्थेचे जेम्स कन्नमपुरा यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
ई -निविदा सुचना क्र. १६ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | नविन विधानभवन मुंबई येथील ६ वा मजल्यावरील मा. मुख्यमंत्री यांचे दालन, उपदालन, समिती कक्ष व सचिव कार्यालय, तसेच तिसऱ्या मजल्यावरील शिवसेना पक्ष कार्यालय दालन क्र. ३०४, ३०५, ३०६ चे नुतनीकरण करणे. | ४,९७,८४,६६६/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १२.८.२०२४ ते दि. १९.८.२०२४ पर्यंत.

निविदा पूर्व बैठक - दि. १४.८.२०२४ (बैठकिचे ठिकाण मुख्य अभियंता यांचे कार्यालय ४ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. २०.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल'ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाचे सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/ ९९०४०
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ९/८/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८३५

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
महाराष्ट्र सागरी मंडळ
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

ई - निविदा सूचना (सन २०२४-२५)

Main Portal : https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी- १ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी(महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खारदांडा समुद्र किनाऱ्या समोरील उरेशी दिपस्तंभाची दुरुस्ती करणे, ता. अंधेरी जि. रायगड. | १,०३,८२,१३४/- | १,०३,५००/- | १,१८०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९.०८.२०२४ रोजी १५:०० वा. पासुन ते दिनांक २६.०८.२०२४ रोजी १७.०० पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
(तुषार पाटोळे)
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८२१

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
महाराष्ट्र सागरी मंडळ
सागरी अभियंता व चिफ सर्व्हेअर
इंडियन मर्कंटाईल चेंबर्स, तिसरा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड पिअर, मुंबई - ४०० ००१.

ई - निविदा सूचना (सन २०२४-२५)

Main Portal : https://mahatenders.gov.in

Department Portal : www.mahammb.maharashtra.gov.in

महाराष्ट्र सागरी मंडळ,मुंबई मार्फत "Dry Docking, Chipping & Painting of Hull, Steel Renewal, Maintenance & Repair of Machinery of M.L.LAVAN at Mumbai " या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Name of Work | Earnest Money Deposit in Rs. | Blank Tender form amount in Rs. |
|---|---|---|---|
| 1. | Dry Docking, Chipping & Painting of Hull, Steel Renewal, Maintenance & Repair of Machinery of M.L.LAVAN at Mumbai. | ५२,०००/- | १,१८०/- |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०९.०८.२०२४ रोजी ११.०० वा. पासून उपलब्ध होतील.
कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

सही/-
सागरी अभियंता व चिफ सर्व्हेअर,
महाराष्ट्र सागरी मंडळ,मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८२०

# सोलापूर विमानसेवेसाठी परवानगी मिळण्याचा मार्ग अंतिम टप्प्यात

■ सोलापूर : यश सावंत

**एकीकडे बोरामणी आंतरराष्ट्रीय कॉर्गो विमानतळ उभारणी रखडलेली असताना दुसरीकडे सोलापूरच्या होटगी रस्त्यावरील जुन्या विमानतळावरील बहुप्रतीक्षित विमानसेवा उशिरा का होईना, अखेर सुरू होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. येत्या सप्टेंबरमध्ये विमानसेवेचा परवाना मिळाल्यानंतर पुढील ऑक्टोबरमध्ये प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे.**

सोलापूरचे सध्याचे छोटेखानी, जुने विमानतळ अवघे ३५० एकर क्षेत्रफळ आकाराचे आहे. या विमानतळावरून यापूर्वी फेब्रुवारी २००९ मध्ये सोलापूरचे तत्कालीन पालकमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने किंगफिशर रेड कंपनीने आठवड्यातून चार दिवस मुंबई-सोलापूर-मुंबई दरम्यान ७२ आसनी विमानसेवा सुरू केली होती. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असतानाच अचानकपणे ही विमानसेवा ऑगस्ट २०१० मध्ये बंद झाली. त्यानंतर गेली १४ वर्षे सोलापूरची विमानसेवा प्रतीक्षेत राहिली असताना दुसरीकडे तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केंद्रातील वजन वापरून सोलापूरजवळ बोरामणी परिसरात सुमारे दोन हजार एकर जमीन संपादित करून आंतरराष्ट्रीय कॉर्गो विमानतळ उभारण्याचा मार्ग खुला केला होता. आवश्यक भूसंपादन होऊनही या आंतरराष्ट्रीय विमानतळाची विमानसेवा आजतागायत रखडली आहे. यात वन विभागाच्या आरक्षित जमिनीचा अडसर असल्याचे सांगितले जाते. परंतु त्यावर मार्ग निघाला नाही. या पार्श्वभूमीवर जुन्या विमानतळाच्या माध्यमातून २०१७ मध्ये मोदी सरकारने देशात जाहीर केलेल्या उडान योजनेत सोलापूरचाही समावेश केला होता. परंतु विमानतळावरील त्रुटी दूर करता आल्या नाहीत. त्यामुळे उडान योजनेच्या माध्यमातून सुरू होणारी विमानसेवा दृश्य पटलावर कधीही आली नाही. अलीकडे विमानतळाला लगतच्या सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या




सहवीजनिर्मिती प्रकल्पाच्या उंच चिमणीचा अडथळा असल्याचे सांगण्यात आले असता, त्यावर मोठा वाद झाला. अखेर वादग्रस्त चिमणी गेल्या वर्षी पाडण्यात आली. त्यानंतर विमानतळ सुसज्ज करून प्रत्यक्ष विमानसेवा सुरू करण्याचे आव्हान उभे ठाकले होते. यात लोकप्रतिनिधींच्या इच्छाशक्तीचा अभाव दिसत असताना सुदैवाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः या प्रश्नावर उच्च स्तरावरून पाठपुरावा केला. त्याचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत. विमानतळाच्या सुधारणांसाठी प्रथमच जिल्हा नियोजन समितीने आर्थिक निधी उपलब्ध करून दिला आहे. विमानतळावर संरक्षक भिंतीसह चार धावपट्टींची बांधणी, विमान रात्री उतरण्याची सोय, वाहतूक नियंत्रण कक्षाची बांधणी, धावपट्टी दर्शवणारे दिवे (पापी लाइट्स), सिग्नल यंत्रणा, सामान तपासणी यंत्रणा आदी कामांची पूर्तता झाली असून, त्या अनुषंगाने अलीकडेच भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया) या विमानतळावर नवीन चार धावपट्टीसह इतर अत्यावश्यक बाबींची व्हीटीसीएनएस बी-३५० या विमानाने चाचणी केली.

# झोपडीवासीयांचे भाडे थकवणारा विकासक काळ्या यादीत, गुन्हाही दाखल! प्राधिकरणाकडून प्रथमच कठोर कारवाई

■ मुंबई : नितीन देवळेकर

झोपडीवासीयांचे अनेक महिन्यांचे भाडे थकविणाऱ्या विकासकांविरुद्ध न्यायालयाच्या दणक्यानंतर कारवाई करणाऱ्या झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने आता अधिक कठोर होत कांदिवली पश्चिम येथील एका झोपु योजनेतील विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या विकासकाला काळ्या यादीत टाकण्यात आले असून घर विक्रीलाही प्रतिबंध करण्यात आला आहे. भाडे थकबाकीसंदर्भात झोपु प्राधिकरणाकडून पहिल्यांदाच अशी कारवाई करण्यात आल्यामुळे विकासकांमध्ये खळबळ माजली आहे. भाडे थकविणाऱ्या विकासकांविरुद्ध प्राधिकरणाने आतापर्यंत घरविक्रीला स्थगिती देण्याची कारवाई केली होती.



त्यानंतरही विकासकांकडून भाडे अदा केले जात नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे आता प्राधिकरणाने कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. झोपडीवासीयांना दोन वर्षांचे आगाऊ भाडे व त्या पुढील वर्षाचे धनादेश देणे बंधनकारक केले आहे. अन्यथा काळ्या यादीत टाकण्यात येईल, असे स्पष्ट केले होते. परंतु आता प्राधिकरणाने थेट विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कांदिवली पश्चिम येथील साई श्रद्धा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेला २०१२ मध्ये मंजुरी मिळाली होती. या योजनेला २०१५ मध्ये इरादा पत्र देण्यात आले. या योजनेत सुरुवातीला मे. पूजा डेव्हलपर्स होते. २०२१ मध्ये मे. सी.जी हौसिंग इन्फ्रा प्रा. लि. यांची विकासक म्हणून नियुक्ती झाली. झोपडीवासीय आणि खुल्या विक्रीतील घरांची ही २३ मजली संयुक्त इमारत असून ए विंगमध्ये पुनर्वसनातील तर बी विंगमध्ये विक्री घटकातील सदनिका प्रस्तावीत करण्यात आले आहेत. ए विंगमधील काही मजले विक्री घटकासाठी देण्यात आले आहेत. गेले १८ महिने भाडे थकित असल्याच्या अनेक तक्रारी प्राधिकरणाकडे आल्या होत्या. याशिवाय पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम अनेक वर्षांपासून बंद असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या होत्या.

# 'लाडकी म्हैस' योजनेसाठी १५ ऑगस्टला कराडला मोर्चा, बळीराजा संघटनेचे दूधदरप्रश्नी आंदोलन

■ कराड : गणेश बागडे

दूधविक्री लिटरला ७० रुपयांवर आणि याचा खरेदीदर ४० रुपये हे न परवडणारे आहे. दूध उत्पादक अनुषंगाने म्हैस व गायीवर हा अन्यायच असल्याने 'लाडकी



बहीण'प्रमाणे 'लाडकी म्हैस' योजना आणण्यासाठी १५ ऑगस्टला भव्य मोर्चा काढून शासनाला जाब विचारणार असल्याचा इशारा बळीराजा शेतकरी संघटनेच्या युवा शाखेचे प्रदेशाध्यक्ष गणेश शेवाळे यांनी दिला. शेवाळे म्हणाले, शासकीय योजनांचे लाभार्थी होताना, शेतकऱ्यांसह महिला व अन्य घटकांचे प्रचंड हाल होत असून, त्यांची प्रशासनाकडून कुचेष्टाच सुरू आहे. लाभार्थ्यांची 'गाढव मेलं ओझ्यानं अन् शिंगरू मेलं हेलपाट्यांन.' अशी अवस्था झाल्याने त्याविरोधातही हे आंदोलन आहे.देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली तरी सुद्धा प्रशासकीय कार्यालयांमध्ये विशेषतः शेतकरी, कष्टकरी, महिला व गोरगरिबांवर अन्याय सुरू आहे. प्रधानमंत्री किसान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण अशा योजनांच्या कागदपत्रांसाठी लाभार्थींची प्रचंड परवड सुरू आहे. त्यात मिळायचे दीड-दोन हजार रुपये अन् त्याच्या हेलपाटेवारी जायचे चार हजार रुपये अशी दयनीय स्थिती आहे.

# 'अजित पवारांनी कधी जातीचं राजकारण केलं नाही', राज ठाकरेंची स्तुतीसुमने; म्हणाले, 'मी खात्रीशीरपणे सांगतो...'

■ मुंबई : राकेश गायकवाड

'महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात जातीपातीचं राजकारण चालू आहे, असा महाराष्ट्र मी यापूर्वी कधीही पाहिला नव्हता', असं म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांवर टीका केली आहे. राज ठाकरे हे बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले, 'जातीपातीचं राजकारण टोकाला पोहोचलं आहे. असा महाराष्ट्र तुम्ही यापूर्वी कधी पाहिला होता का? तुम्ही सर्व पत्रकार मंडळी अनेक वर्षांपासून मराठवाड्यात काम करत आहात, तुम्ही तरी कधी असा महाराष्ट्र पाहिला होता का? मला कधीकधी वाटतं की सर्वांनीच स्वतःला विचारायला हवं की आपण व आपलं राज्य कधी असं होतं का?'



राज ठाकरे म्हणाले, काही लोकांनी महापुरुष जाती-जातीमध्ये वाटून टाकले आहेत. संतांची आडनावं बाहेर काढली जात आहेत. त्यामागून जे काही राजकारण करायचंय, जे राजकीय उद्योग करायचे आहेत ते चालू आहेत. या सगळ्याची मला किव येते. पत्रकारही आता बदलले आहेत. सर्व पक्षांनी जातीची समीकरणं बनवली आहेत आणि स्वतःच्या फायद्यासाठी ही सगळी मंडळी अतिशय तीव्रपणे लोकांच्या मनात विष कालवत आहेत.मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे सातत्याने ज्येष्ठ नेते शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष) व उद्धव ठाकरे (शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख) यांच्यावर टीका करत आहेत. तसेच जातीपातीच्या राजकारणाची सुरुवात शरद पवारांनी केली असा आरोप राज ठाकरे यांनी आतापर्यंत अनेक वेळा केला आहे. त्यावरून राज ठाकरे यांना प्रश्न विचारला की तुम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल फार बोलत नाही. त्यावर राज ठाकरे म्हणाले, 'मी अजित पवारांबद्दल तुम्हाला एक गोष्ट सांगतो ते पूर्वी शरद पवारांबरोबर होते, पवारांचं जातीचं राजकारण चालू होतंष्ठ जेम्स लेन वगैरे प्रकरण चालू होतंष्ठ मी तुम्हाला खात्रीलायक सांगतो की अजित पवार हे कधी जातीच्या राजकारणात पडले नाहीत आणि ही गोष्ट निश्चित आहे.'

# नाशिक, अहमदाबाद महामार्गावर अवजड वाहतुकीस निर्बंध: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश

■ मुंबई : यश सावंत

ठाणे-नाशिक आणि मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खड्ड्यांची अत्याधुनिक ( रॅपीड क्वीक हार्डनर, एम सिक्टी) तंत्रज्ञानाचा वापर करून तातडीने रस्ते दुरुस्ती करावी आणि नागरिकांना वाहतूक कोंडीतून दिलासा द्यावा, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी राष्ट्रीय महामार्ग, एमएसआरडी, सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच ठाणे, पालघर, नाशिक व रायगड जिल्ह्यात सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री अकरा यावेळेत अवजड वाहतूक बंद करण्याचे आदेशही त्यांनी दिले.मुख्यमंत्री उद्या (शुक्रवारी) ठाणे-नाशिक महामार्गाची पाहणी करणार आहेत. ठाणे, पालघर, नाशिक, रायगड जिल्ह्यातील महामार्गावरील वाहतूक कोंडी, आगामी गणेशोत्सव कालावधीतील वाहतुकीचे नियोजन याबाबत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक झाली. त्यावेळी शिंदे यांनी खड्डे बुजविणे आणि रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर करण्याच्या सक्त सूचना दिल्या. दरम्यान, रात्री ११ ते पहाटे ५ आणि दुपारी १२ ते ४ याच वेळात अवजड वाहनांना वाहतुकीला परवानगी देण्यात आली आहे. नाशिक- भिवंडी रस्त्याची दुरवस्था झाली



आहे. याची गंभीर दखल घेत दुरुस्तीसाठी युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या. तसेच नवी मुंबई, पनवेल, जेएनपीटी भागातून येणाऱ्या वाहतुकीच्या नियमनासाठी सिडकोने नवी मुंबई पोलिसांना २०० वाहतूक नियंत्रक कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत. तसेच अवजड वाहनांसाठी आवश्यक तेवढ्या क्रेन जेएनपीटीने उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही शिंदे यांनी यावेळी दिल्या. ठाणे ते नाशिक, ठाणे ते अहमदाबाद या महामार्गावरील खड्ड्यांबाबत मुख्यमंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे होणाऱ्या त्रासातून तात्काळ दिलासा देण्यासाठी यंत्रणांनी दिवसरात्र एक करून खड्डे बुजवावेत.

पान १ वरुन...

## 'मुख्यमंत्री माझी...

घरातील महिलांना घरखर्च करताना कसरत करावी लागते. त्यांना आधार देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेतून राज्य शासन करत आहोत. ही योजना सध्या मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहे. त्याचप्रमाणे अन्नपूर्णा योजनेतून वर्षातून तीन गॅस सिलेंडर देण्यात येणार आहेत. 'लेक लाडकी लखपती योजना' तसेच मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क माफी अशा योजनेतून महिलांना केंद्रबिंदू मानून राज्य शासन काम करत आहे. या कल्याणकारी योजनांसाठी निधीची तरतूद करूनच त्याची अंमलबजावणी केली जात आहे.

महाराष्ट्र हे राज्य प्रगतीशील राज्य असून राज्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात आली आहेत. मोठ्या प्रमाणात उद्योग सुरू होत असून रोजगार संधी निर्माण होत आहेत, असेही त्यांनी सांगितले. माध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. राज्य शासन करत असलेली सकारात्मक कामे, योजना ही माध्यमांनी आपल्या व्यासपीठावरून लोकांपर्यंत पोहोचवावीत. लोकांच्या हिताची कामे दाखवावेत. वस्तुनिष्ठ माहिती पोचवावी. लोकांच्या समस्यांना वाचा फोडणारी पत्रकारिता व्हावी अशी अपेक्षा आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## खासदार सुप्रिया सुळेंचं...

त्यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की माझे व्हॉट्सअ‍ॅप सुरू झाले आहे. व्हॉट्सअ‍ॅप टीमने यासाठी अतिशय मोलाचे सहकार्य केले. याबद्दल टिम व्हॉट्सअ‍ॅप व पुणे ग्रामीण पोलिसांचे मनापासून आभार. दरम्यानच्या काळात कुणी मेसेज केले असतील तर त्यांना मला या तांत्रिक बिघाडामुळे रिप्लाय करता आला नाही, याबद्दल क्षमस्व.

दरम्यान, खासदा सुळे यांनी नागरिकांना एक सल्ला दिला आहे. त्या म्हणाल्या, नागरीकांना माझी विनंती आहे की आवश्यक ती सर्व काळजी घेऊनही माझे व्हॉट्सअ‍ॅप हॅक झाले होते. कृपया आपण सर्वजण डिजीटल सुरक्षेविषयी आवश्यक ती काळजी घ्या. व्हॉट्सअ‍ॅप वापरताना टू फॅक्टर व्हेरीफिकेशन करुन घ्या. आपले पासवर्ड, ओटीपी कुणालाही देऊ नये. तसेच अनोळखी क्रमांकावरुन आलेल्या लिंक क्लिक करु नये. डिजिटल सुरक्षा ही अतिशय महत्त्वाची बाब असून आपण आवश्यक ती काळजी घ्यायला हवी. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी हॅकरकडून अकाऊंट परत मिळवण्यासाठी पैसे दिले नाहीत. पोलिसांनी व व्हॉट्सअ‍ॅप टीमने त्यांचं अकाऊंट परत मिळवून दिलं आहे.

## उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावरील....

बीडमध्ये तर उघडपणे उबाठा शिवसेनेच्या जिल्हाध्यक्षाने निदर्शनाच्या नावाखाली फार्स केला आणि त्यावर कुठेही निषेधाचा सूर लवकर न उमटल्यामुळे माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी जे केलं ते केलं. या संपूर्ण काळात महाराष्ट्र सैनिक ज्या पद्धतीने सावध राहिला तसं त्याने यापुढे देखील रहावं. मी कालच्या पत्रकार परिषदेत पण सांगितलं होतं की माझ्या नादाला लागू नका कारण माझा महाराष्ट्र सैनिक काय करेल हे तुम्हाला कळणार नाही. ज्याची प्रचिती कालच आली', असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.


**महाराष्ट्र शासन**

**इलाखा शहर विभाग, (सा.बां.)**

**ई -निविदा सुचना क्र. १५ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागविल आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ६/३० | १२.४९ |
| २ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ६/३४ | १२.५९ |
| ३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-१७ | १२.५४ |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-२० | १३.०२ |
| ५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-१५ | १३.०८ |
| ६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-७ | १२.६३ |
| ७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-१२ | १२.५३ |
| ८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-५ | १२.५९ |
| ९ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-३ | १२.४८ |
| १० | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-४ | १३.०४ |
| ११ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/अ-११ | १९.२३ |
| १२ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-११ | १२.५८ |
| १३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-१५ | १२.५२ |
| १४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-२० | १२.५७ |
| १५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-१७ | १२.६३ |
| १६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-१२ | १२.६७ |
| १७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-८ | १२.५८ |
| १८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-१५ | १४.९१ |
| १९ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १४/ब-१७ | १२.७४ |
| २० | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १४/ब-६ | १२.६३ |
| २१ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-११ | १२.४८ |
| २२ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-२२ | १२.४२ |
| २३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/अ-८ | १८.३० |
| २४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-१७ | १२.६० |
| २५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-५ | १२.६३ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ९.८.२०२४ ते दि. १६.८.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १९.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ७७०३२
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ५/८/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१८२८



**महाराष्ट्र शासन**

**इलाखा शहर विभाग, (सा.बां.)**

**ई -निविदा सुचना क्र. ६ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-२ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश आवास व विकास परिषदेतर्फे भूमी विकास गृह स्थान एव बाजार योजना (ग्रीन फील्ड टाऊनशिप), शहनेवाजपूर माझा, अयोध्या (उत्तर प्रदेश) येथे महाराष्ट्र भवन (भक्त निवास) बांधकाम करणे.(स्थापत्य व विद्युत कामे सह) | १३४४३.४३ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ८.८.२०२४ ते दि. २२.८.२०२४ पर्यंत.

निविदा पूर्व बैठक - दि. १६.८.२०२४ (बैठकिचे ठिकाण मुख्य अभियंता यांचे कार्यालय ४ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)

ई-निविदा उघडणे- दि. २३.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ७०७०७
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : २२/७/२०२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१८२५

# मुंबई महानगरपालिका आयुक्त निवडणूक निर्णय अधिकारी; लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीची जबाबदारी

■ **मुंबई : सम्यक कासारे**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभरात जिल्हाधिकाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी घोषित करणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाने आता मुंबईत मात्र ही जबाबदारी आणि अधिकार मुंबई महापालिका आयुक्तांवर सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी मुंबई महापालिका आयुक्तांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. आगामी विधानसभा निवडणूक ही मुंबई महापालिका आयुक्तांना पार पाडावी लागणार आहे. देशभरात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांसाठी प्रामुख्याने जिल्हाधिकारी यांना जिल्हा



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून घोषित करण्यात येते. मात्र, चेन्नई आणि बेंगळूरु या शहरामध्ये सर्व कारभार महापालिकांच्या अखत्यारित येत असल्याने तेथे निवडणुकांची जबाबदारी आणि अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून महापालिका आयुक्तांवर सोपविण्यात आले आहेत. या दोन्ही शहरात उपक्रम यशस्वी ठरलेला हा उपक्रम आता मुंबईतही राबविण्यात येणार आहे. मुंबईत शहर जिल्हा आणि उपनगर जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी घोषित करण्यात आले असून आजवर तेच निवडणुका घेत होते. मात्र, मुंबईत सर्व यंत्रणा पालिकेकडे असल्याने निवडणुका घेताना जिल्हाधिकाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

# १५ मच्छीमार संघटनांचा 'वाढवण'ला पाठिंबा: बंदर समन्वय समिती बैठकीत सकारात्मक चर्चा

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

वाढवण बंदर विकासात मच्छीमार बांधव आणि स्थानिकांचे हितच पाहिले जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिले. बंदरामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याने १५पेक्षा जास्त मच्छीमार संघटनांनी प्रकल्पाला पाठिंबा दिल्याची माहिती वाढवण बंदर समन्वय समितीकडून देण्यात आली. समितीच्या शिष्टमंडळाबरोबर मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. स्थानिकांच्या मागण्यांबाबत बंदर विकास यंत्रणांनी बैठक घेऊन, संवाद आणि समन्वयातून काम करावे, असे आदेश मुख्यमंत्र्यांची बैठकीत दिले. बंदर विकासासाठी भूसंपादन, अधिग्रहण झाल्यास, त्याला विहीत पद्धतीने नुकसानभरपाई मिळेल, याची दक्षता घेतली जाईल. या प्रकल्प उभारणीपूर्वीच जेएनपीए आणि बंदर विभागाने मच्छीमार बांधवांशी संवाद साधून, त्यांचे म्हणणे जाणून घ्यावे. त्यांच्या शंकांचे समाधान करावे. त्यांच्या व्यवसायाबाबत काही अडचणी असल्यास, त्यांना होणाऱ्या नुकसानाबाबत सर्वकष चर्चा करून, भरपाई आणि उपाययोजनांचे पर्याय निश्चित करावेत, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यावेळी जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ म्हणाले, की बंदरामुळे निर्माण होणाऱ्या रोजगार संधी स्थानिकांनाच मिळाव्यात यासाठी आतापासूनच प्रयत्न



केले जात आहेत. त्यासाठी कौशल्य प्रशिक्षणाचे तीस कार्यक्रम निश्चित केले गेल आहेत. पालघर जिल्ह्यातील बंदर परिसरातील तालुक्यांत तरुणांसाठी हे प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बैठकीत वाढवण बंदर समन्वय समितीच्या वतीने झाई, सातपाटीसह विविध गावांतील मच्छीमारांच्या मागण्यांची माहिती देण्यात आली. या मागण्यांबाबत सकारात्मक मार्ग काढण्यात येईल, अशी चर्चाही झाली. हा प्रकल्प राष्ट्रहिताचा आणि पालघर जिल्ह्यात मोठ्या रोजगार संधी निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा असल्याने आता जिल्ह्यातील पंधराहून अधिक मच्छीमार संघटनांनी या प्रकल्पाबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याची माहितीही या बैठकीत देण्यात आली.

# तुरूंगातील ई-मुलाखत, दूरचित्रसंवाद प्रणालीच्या सुविधांची माहिती द्या; उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

राज्यभरातील तुरूंगातील ई-मुलाखत आणि दूरचित्रसंवाद प्रणालीच्या (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) सुविधेच्या स्थितीचा तपशील सादर करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

ठाणे, मुंबईतील आर्थर रोड आणि भायखळा महिला कारागृह, नवी मुंबईतील तळोजा, कल्याण येथील आधारवाडी, पुणे येथील येरवडा आणि कोल्हापूर, नाशिक येथील कारागृहातील किती आरोपींना दूरसिचत्रसंवाद प्रणाली आणि प्रत्यक्षरीत्या न्यायालयात उपस्थित करण्यात आले, याची आकडेवारी सादर करण्याचे आदेश न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या एकलपीठाने सरकारला दिले आहेत. याशिवाय, या तुरुंगांमध्ये ई-मुलाखतीची सुविधा किती प्रमाणात उपलब्ध आहे हे देखील स्पष्ट करण्याचे आदेश दिले. कैद्यांना त्यांच्या कुटुंबियांशी संवाद



साधता यावा यासाठी ई-मुलाखतीची सुविधा कारागृहात उपलब्ध करण्यात आली आहे. तर, अपुऱ्या पोलीस मनुष्यबळाच्या पार्श्वभूमीवर कैद्यांना कारागृहातूनच दूरचित्रसंवाद प्रणालीच्या माध्यमातून न्यायालयात उपस्थित केले जाते. परंतु, या सुविधा योग्य प्रकारे कार्यान्वित नसल्याची दखल न्यायालयाने एका आरोपीने जामिनासाठी केलेल्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी घेतली होती. तसेच, या मुद्याप्रकरणी स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेतली होती. याशिवाय, कैद्यांना दूरचित्रसंवाद प्रणालीच्या माध्यमातून न्यायालयात उपस्थित करता येईल यासाठी राज्यभरातील सर्व तुरुंग आणि न्यायालयांमधील दूरचित्रसंवाद प्रणाली सुविधेकरिता सरकारने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा असे आदेशही दिले होते.

# गुरांचे गोठे मुंबईबाहेर जाणार; पालिका नोटीस बजावणार

■ **मुंबई : गणेश बागडे**

मुंबईतील सर्व गाई म्हशींचे गोठे, तबेले मुंबईबाहेर हटवण्याच्या निर्णयाला वेग येण्याची शक्यता असून मुंबई महापालिका आता मुंबईतील सर्व तबेल्यांना नोटीस बजावणार आहे. हे सर्व गोठे दापचेरी येथे हटवण्यात येणार आहेत. मुंबईत एकूण २६३ तबेले असून ते हटवण्यासाठी राज्य सरकारच्या पशुसंर्वधन आणि दुग्धव्यवस्या विभागाने पालिका प्रशासनाकडे मदत मागितली आहे. त्यानुसार पालिकेने या गोठ्यांना नोटीस बजावण्याचे ठरवले आहे.



मुंबई उपनगरात विविध ठिकाणी गाई म्हशींचे गोठे आहेत. ते मुंबई शहराबाहेर स्थलांतरीत करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने २००५ मध्ये घेतला होता. पालघर जिल्ह्यातील दापचेरी येथे ते स्थलांतरीत करण्यात येणार होते. मात्र, मुंबई दूध उत्पादक संघटनेने या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या निर्णयाच्या बाजूने निकाल दिला होता. त्यानंतर संघटनेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र तेथेही संघटना हरली. त्यामुळे गोठे शहराबाहेर नेण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले होते. मात्र हा निकाल येऊन तीन, चार वर्षे झाली तरी हे गोठे अजूनही मुंबईत आहेत. त्यामुळे राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने आता पालिकेकडे मदत मागितली आहे. गोठे हटवण्यासाठी राज्य सरकारच्या संबंधित विभागाकडे पुरेशी यंत्रणा नसल्यामुळे पालिकेने ते हटवावे अशी मागणी पालिका प्रशासनाकडे केली आहे. त्यानुसार पालिकेने आता मुंबईतील गोठ्यांचे सर्वेक्षण केले असून त्यांना नोटीसा पाठवण्याचे ठरवले आहे, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. गोठ्यांना पाठवण्यात येणाऱ्या नोटीशीचा मसूदा तयार करण्यात आला असून त्याला आयुक्तांची मंजुरी घेण्यात येणार आहे. त्यानंतर तबेल्यांच्या जागांचेही सर्वेक्षण करून क्षेत्रफळ मोजण्यात येणार आहे.जनावरांचा मुंबईकरांना त्रास गोठ्यांतील शेण, मलमूत्र रेल्वे रुळांजवळ किंवा नदी नाल्यात सोडले जात असल्याची तक्रार अनेकदा केली जाते. तसेच जनावरे अन्नाच्या शोधात शहरातून फिरत असतात. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. अंधेरीच्या गोखले पुलावरही गायी नेणाऱ्यांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याच्या तक्रारी अनेकदा आल्या होत्या.

# अपंगांच्या राखीव लोकल डब्यातून प्रवास करणाऱ्या सामान्य प्रवाशांवर डोंबिवली पोलिसांची कारवाई

■ **डोंबिवली: सतिश सोनावणे**

लोकलमधील अपंगांच्या विशेष राखीव डब्यातून प्रवास करणाऱ्या सात सामान्य प्रवाशांवर गुरुवारी डोंबिवली लोहमार्ग पोलीस आणि रेल्वे सुरक्षा बळाच्या पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई केली. या प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ही तपासणी मोहीम यापुढे सुरूच राहणार आहे, असे डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे यांनी सांगितले.

लोकलच्या वाढत्या गर्दीला कंटाळून अलीकडे अनेक सामान्य प्रवासी गर्दीच्या वेळेत तिकीट तपासणीस येत नाहीत. या संधीचा गैरफायदा घेऊन अपंगांच्या डब्यातून प्रवास करतात. अपंगांच्या डब्यातील सामान्य प्रवाशांची गर्दी वाढू लागल्याने अपंगांना बसण्यास किंवा डब्यात उभे राहण्यास जागा मिळत नाही. अनेक प्रवासी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, घाटकोपर भागातून अपंगांच्या डब्यातून प्रवास करतात. त्यामुळे ठाणे पुढील रेल्वे स्थानकातील अपंगांना



अपंगांच्या डब्यातील सामान्य प्रवाशांच्या गर्दीमुळे चढता येत नाही.

बदलापूर, टिटवाळा, डोंबिवली, कल्याण भागातील अनेक अपंग नोकरी, व्यवसायासाठी मुंबई परिसरात जातात. काही असाध्य व्याधी असणारे रुग्ण याच डब्यातून मुंबईचा प्रवास करून मुंबईतील रुग्णालयांमध्ये जातात. त्यांनाही अपंगांच्या डब्यात अलीकडे जागा मिळत नाही. लोकल मधील अपंगांच्या डब्यातील सामान्य प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे, होणाऱ्या त्रासामुळे अनेक अपंग प्रवाशांनी डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या होत्या. दिवा, डोंबिवली, कल्याण रेल्वे स्थानकात उतरणारे अनेक सामान्य प्रवासी अपंगांच्या डब्यातून प्रवास करतात, अशा तक्रारी होत्या. या तक्रारींची दखल घेऊन डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे, रेल्वे सुरक्षा बळाचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर यांनी गुरूवारी डोंबिवली रेल्वे स्थानकात मुंबईकडून येणाऱ्या आणि जाणाऱ्या लोकल डब्यांमधील अपंगांच्या डब्यांमधील प्रवाशांची शोध मोहीम राबवली.

# जाचक अटींमुळे गणेशोत्सव मंडळांना पाच वर्षे परवाना दूरच

■ **मुंबई : यश सावंत**

सलग पाच वर्षे मंडप परवाना मिळविण्यासाठी गेल्या दहा वर्षांत मंडळावर एकदाही कारवाई न होण्याची अट यंदाच्या वर्षी गणेशोत्सव मंडळांना जाचक ठरण्याची शक्यता आहे. सरकारी यंत्रणांकडून एकदाही कारवाई न झालेली मंडळेच कमी आहेत. त्यामुळे बहुसंख्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सलग पाच वर्षे मंडप परवाना मिळणे दुरापास्त ठरणार आहे.

या संदर्भातील शासन निर्णयात बदल करण्याची मागणी होऊ लागली आहे. ही बाब लक्षात घेऊन पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीच्या शिफारसीप्रमाणे शासन निर्णयात आवश्यक बदल करण्याचा प्रस्ताव तातडीने राज्य सरकारला पाठविण्यात येईल. मात्र, या प्रक्रियेस होणाऱ्या विलंबामुळे यंदा तरी मंडळांना सलग पाच वर्षांच्या मंडप परवान्यास मुकावे लागणार आहे. दरवर्षी मुंबईत मोठ्या धूमधडाक्यात गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. मोकळी मैदाने, रस्ते, पदपथ, चाळी,



सोसायट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा होतो. मुंबईमध्ये १२ हजारांहून अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे असून त्यापैकी बहुसंख्य मंडळांना मंडप उभारण्यासाठी महापालिकेचा परवाना घेणे बंधनकारक आहे. मंडपाचे आकारमान, त्याची रचना, तेथे करण्यात येणाऱ्या अग्निप्रतिबंधक उपाययोजना आदी विविध माहिती मंडळांना सादर करावी लागते. त्याचबरोबर अग्निशमन दल, वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस ठाण्याचे 'ना हरकत' प्रमाणपत्र सादर केल्यानंतर महापालिकेकडून मंडपासाठी परवाना देण्यात येतो.

रस्ता वा पदपथावर मंडप उभारून साजरा करण्यात येणाऱ्या गणेशोत्सवाबाबत ठोस उपाययोजना करण्याचे आदेश न्यायालयाने २०१५ मध्ये दिले आहेत. गणेशोत्सवासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपांमुळे पादचारी वा वाहतुकीला कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, असे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

काही मंडळांकडून महापालिका, पोलिसांच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे. नियमभंग केलेल्या अथवा कारवाई झालेल्या मंडळांची संख्या तुलनेने अधिक आहे. तसेच करोनाकाळात अनेक मंडळांनी गणेत्सव साजरा केला नाही.

# ईडी अधिकारी व्यावसायिकाच्या माध्यमातून खंडणी उकळत असल्याचा आरोप, प्रकरण बंद करण्याबाबतचा एसीबीचा अहवाल न्यायालयाने स्वीकारला

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

सक्तवसुली संचालनालयाचे (ईडी) अधिकारी व्यावसायिक जितेंद्र नवलानी याच्या माध्यमातून विविध खासगी कंपन्यांकडून खंडणी उकळत असल्याच्या आरोपांबाबत दाखल प्रकरण बंद करण्याचा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेला अहवाल विशेष न्यायालयाने स्वीकारला. त्यामुळे, हे प्रकरण निकाली निघणार आहे. विशेष म्हणजे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात याबाबतचा आरोप केला होता. तसेच, त्यांच्या तक्रारीनंतर या प्रकरणी एसीबीने गुन्हा दाखल केला होता. ईडीचे अधिकारी नवलानी याच्या माध्यमातून विविध खासगी कंपन्यांकडून खंडणी उकळत असल्याचा आणि आतापर्यंत ५८.९६ कोटी रुपये उकळल्याचा आरोप राऊत यांनी केला होता. त्यानंतर राऊत यांनी या प्रकरणी दाखल केलेल्या तक्रारीवरून एसीबीने एप्रिल २०२२ मध्ये नवलानी याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल केला होता. या वर्षी जानेवारीमध्ये



एसीबीने प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल विशेष न्यायालयात दाखल केला होता. त्यात, नवलानी याने आपल्या पदाचा किंवा प्रभावाचा गैरवापर करून खंडणी उकळल्याचा कोणताही पुरावा आढळला नसल्याचा दावा करण्यात आला होता. विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए. ए. नांदगावकर यांनी एसीबीचा प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल स्वीकारण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. तसेच, हा अहवाल का स्वीकारला जात आहे याचा तपशीलवार आदेश देण्याचे म्हटले. दरम्यान, नवलानी यांनी २०१५ ते २०२१ या आर्थिक वर्षात ३९ खासगी कंपन्यांकडून खंडणी उकळली. तसेच, ती रक्कम त्यांच्या वैयक्तिक आणि कंपनीच्या बँक खात्यांमध्ये वळवली, असा आरोप राऊत यांनी तक्रारीत केला होता.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,**
**दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८
**ई -निविदा सुचना क्र. १० सन २०२४-२०२५**
**(फक्त मुंबई उपनगर जिल्हा — पुर्व उपनगरे मजुर सहकारी संस्था यांचे साठी )**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक-२६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पुर्व उपनगरे) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, कडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. नमुद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगौण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला, मुंबई इमारत क्र. ९१ येथे आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतींवर प्लास्टरिंग व बाह्य संरचना दुरुस्ती करणे | रु.२५२७०५८/- |
| २ | मुळगौण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला, मुंबई इमारत क्र. ९१ येथे आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतींवर प्लास्टरिंग व अंतर्गत संरचना दुरुस्ती करणे | रु.२५८४४२३/- |
| ३ | मुळगौण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला, मुंबई इमारत क्र. ९१ येथे निवासी इमारतींवर टेरेस वॉटरप्रूफिंग, डबल्यू.सी. बाथ वॉटरप्रूफिंग प्रदान करणे. | रु. २०४२३८६/- |
| ४ | मुळगौण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला, मुंबई इमारत क्र. ११२ येथे आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतींवर प्लास्टरिंग व बाह्य संरचना दुरुस्ती करणे | रु. २६६२०९८/- |
| ५ | मुळगौण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला, मुंबई इमारत क्र. ११२ येथे आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतींवर प्लास्टरिंग व अंतर्गत संरचना दुरुस्ती करणे | रु. २७२४६४४/- |
| ६ | मुळगौण कामांतर्गत नेहरू नगर, कुर्ला, मुंबई इमारत क्र. ११२ येथे निवासी इमारतींवर टेरेस वॉटरप्रूफिंग, डबल्यू.सी. बाथ वॉटरप्रूफिंग प्रदान करणे. | रु. १७७९९४६/- |
| ७ | मुळगौण कामांतर्गत नवजीवन महिला वसतीगृह देवनार येथे प्रसाधनगृहांचे नुतनीकरण करणे. | रु.३६९१४१४ /- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदाउपलब्धकालावधी- दि. १३/०८/२०२४ ते दि.२०/०८/२०२४ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि. २१/०८/२०२४**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७७९३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक : 07 AUG 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८७८



**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दुरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां.विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ कोऱ्या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक ९.८.२०२४ ते १६.८.२०२४ पर्यंत देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक १९.८.२०२४ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ.क्र. | कामांचे नांव | अंदाजित किंमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेल हेवन इमारती मंबई येथील सदनिका क्र. १७ येथील प्लास्टर, टाईल्स, पॉलिमर मोर्टर, दरवाजे, खिडक्या यांची रंगकाम व दुरुस्ती करणे. | ८,४३,५८७/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | मलबार हिल मुंबई येथील शिवनेरी बंगलाचे प्रिमाईस पार्किंग रोडची दुरुस्ती करणे. | ८,२८,९१४/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | मलबार हिल येथील मुंबई येथील रॉयल स्टोन सेवक निवासस्थान येथे प्लास्टर, रंगकाम इ. दुरुस्ती करणे. | ८,३७,०६७/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | चर्चगेट मुंबई येथील केदार इमारतीच्या सदनिकांची दुरुस्ती आणि रंगकाम करणे. | ३,९९,०५५/- | ४,०००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | मलबार हिल मुंबई येथील मुक्तागीरी बंगल्याची दुरुस्ती व रंगकाम करणे. | ८,३८,२४२/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | चर्चगेट मुंबई येथील आसावरी इमारत येथे अंतर्गत कॉंक्रीट पॅच तर्क ची दुरुस्ती करणे. | ८,४१,८६०/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ७ | एल.टी.मार्ग मुंबई येथील सी.पी.ऑफीस प्रिमाईस ब्री. ब्लॉक रूम नं. ४०, ४३, २५ येथील २ रा मजल्यावरील पोलीस कॉन्स्टेबल क्वॉटर्स येथे नुतनीकरण करणे. | ८,४२,४९६/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

आ.क्र. इशवि/निलि/ ११०३२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ९/८/२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८२७

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

# दादर सूटकेस हत्या प्रकरणाला नवं वळण, अर्शदच्या पत्नीचे मारेकऱ्याशी अनैतिक संबंध असल्याचा आरोप

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मुंबईतल्या दादर सूटकेस हत्या प्रकरणात आता नवा ट्विस्ट समोर आला आहे. कारण या प्रकरणी आता हत्या झालेल्या अर्शद हत्या प्रकरणात त्याची पत्नी रुखसानाला पोलिसांनी अटक केली आहे. ४ ऑगस्टला अर्शदची दोघांनी हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह दोघांनी दादरच्या तुतारी एक्स्प्रेसमधून घेऊन जात होते. मात्र पोलिसांना या दोघांच्या हालचालींवर संशय आला आणि त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात आता हत्या झालेल्या अर्शदच्या पत्नीला अटक करण्यात आली आहे. दादर रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ११ येथे दोन मूक बधिर व्यक्ती तुतारी एक्सप्रेसमध्ये चढत होते. या दोघांकडे चाकं असलेली एक ट्रॉली बॅग होती. मात्र, ही बॅग ट्रेनमध्ये चढवताना या दोघांची प्रचंड दमछाक झाली होती. बॅगेच्या वजनामुळे दोघांनाही बॅग रेल्वे गाडीत चढवताना चांगलाच घाम फुटला होता. त्यावेळी या फलाटावर रेल्वे सुरक्षा दलाचे जवान संतोषकुमार यादव आणि पोलीस अंमलदार माधव केंद्रे हे गस्तीवर होते. त्यांना या दोन्ही व्यक्तींची हालचाली बघून संशय आला. त्यामुळे त्यांनी या दोघांना थांबवून बॅग उघडायला सांगितली. ही बॅग उघडल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला. या बॅगेत रक्ताने माखलेला एक मृतदेहकोंबून ठेवला होता. या मृतदेहाच्या डोक्यावर गंभीर



घाव होते. पोलिसांनी संबंधित व्यक्ती आणि बॅग ताब्यात घेऊन पुढील तपासाला सुरुवात केली. या तपासणीत हा मृतदेह अर्शद अली सादिक अली शेख (वय ३०) याचा असल्याचे समजलं. आता अर्शद अली सादिक शेखची हत्या का आणि कशी झाली? ते समोर आलं आहे. आरोपी पायधुनीतून दादरला आले होते. अर्शद याची हत्या शिवजीत सिंग आणि जय चावडा यांनी का केली? हे आता समोर आलं आहे. आता अर्शदच्या पत्नीमुळे ही हत्या झाल्याचं समोर येतं आहे. रुखसाना आणि जय यांचे अनैतिक संबंध होते अशी माहिती समोर आली आहे.जय चावडा, शिवजीत सिंग हे दोघंही मूक बधिर असल्याने त्यांच्याकडून माहिती मिळवण्यासाठी पोलिसांना साईन लँग्वेज एक्स्पर्टची मदत घ्यावी लागली. अशात आता रुखसाना आणि जय चावडा यांचे अनैतिक संबंध होते अशी माहिती समोर येते आहे. रुखसानाने तिचे What's App चॅट रविवारी डिलिट केले होते. एवढंच नाही तर अर्शदची हत्या करण्यापूर्वी जय चावडा आणि शिवजीत सिंग यांनी अर्शदला टॉर्चर केलं होतं. त्याला विवस्त्र करुन मारहाण केली. तसंच मारहाण करताना त्याचा व्हिडीओही काढला होता. त्यांच्या बेळगावमध्ये राहणाऱ्या मित्राला व्हिडीओ कॉल करुन त्यांनी ही मारहाण दाखवली होती. अर्शदची हत्या केल्यानंतर त्याचा रक्ताने माखलेला मृतदेह जय आणि शिवजीतने बॅगेत भरला. त्याच्या मृतदेहाची कोकणात जाऊन विल्हेवाट लावायची असं त्यांनी ठरवलं होतं. मात्र त्यांचा हा कट पोलिसांमुळे उघडकीस आला आणि या हत्येची उकल झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अर्शदची पत्नी रुखसाना ही देखील मूक बधिर आहे. तिला दोन मुलं आहेत. एवढंच नाही तर जय चावडा आणि तिचे संबंध होते. दोघंही विविध व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये होते अशीही माहिती समोर आली आहे. जय चावडाचं कुटुंब कॅनडात आहे तो चांगलाच श्रीमंत आहे.

# कल्याण रेतीबंदरमध्ये बेकायदा इमारतीमधील घरांची विक्रीकरून १० जणांची फसवणूक

**कल्याण : विशेष प्रतिनिधी**

कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी रेतीबंदर भागातील कल्याण डोंबिवली पालिकेच्या बेघरांसाठी घरे, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या राखीव भूखंडावर भूमाफियांनी पालिकेच्या बनावट बांधकाम परवानग्या तयार करून युसुफ हाईट्स ही १० माळ्याची बेकायदा इमारत उभारली. ही बेकायदा इमारत अधिकृत, पालिकेच्या परवानगीने बांधली आहे असे १० घर खरेदीदारांनी खोटे सांगून त्यांची घर खरेदीच्या माध्यमातून एक कोटी ८२ लाख रूपयांची फसवणूक केली आहे. सन २०१२ ते मार्च २०२४ या कालावधीत या बेकायदा



इमारतीची उभारणी करून यामधील घर खरेदीदारांना भूमाफियांनी विक्री केल्या आहेत. सलमान अनिस डोलारे, फराज मैहमूद हारे आणि इतर अशी भूमाफियांची नावे आहेत. कल्याण डोंबिवली पालिकेच्या दुर्गाडी रेतीबंदर भागातील बेघरांसाठी घरे या आरक्षण क्रमांक ९७ वरील ३७६ चौरस मीटरच्या राखीव भूखंडावर, ११५ चौरस मीटरच्या आरक्षण क्रमांक ९८ वरील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर युसूफ हाईट्स ही बेकायदा इमारत उभारण्यात आली आहे. दहा माळ्याची ही बेकायदा इमारत उभारण्यासाठी भूमाफियांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या बनावट बांधकाम परवानग्या, बनावट स्वाक्षऱ्या, खोटे शिक्के वापरले. महसूल विभागाची बनावट अकृषिक परवानगी तयार करण्यात आली. बनावट भोगवटा प्रमाणपत्रे तयार करण्यात आले. ही सर्व कागदपत्रे खरी आहेत असे दाखवून भूमाफियांनी या बेकायदा इमारतीची मागील १४ वर्षाच्या कालावधीत उभारणी केली. मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर दुर्गाडी रेतीबंदर भागात युसुफ हाईट्स इमारत आहे. या इमारत घर खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना आरोपींनी ही इमारत अधिकृत आहे.

# मुंबईतील २५ महिलांना पाठवली अश्लील ऑडिओ टेप: विकृताला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

मुंबईतील २५ महिलांना अश्लील ध्वनीचित्रफीत पाठवणाऱ्या विकृताला मुंबई पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. निर्मल नगर पोलीस ठाण्याने ही कारवाई केली असून आयटी ॲक्ट व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद अजीज मोहम्मद निसार खान (३६) असे अटक आरोपीचे नाव असून तो वांद्रे येथील बेहरापाडा परिसरात पराठाचे दुकान चालवतो. आरोपी मूळचा उत्तर प्रदेशातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. वांद्रे पूर्व येथील ३० वर्षीय गृहिणीला १४ जूनला अनोळखी क्रमांकावरून मोबाईल क्रमांकावरून दूरध्वनी



आला होता. दूरध्वनी करणारा व्यक्ती अश्लील संभाषण करू लागला. महिला दूरध्वनीवर त्याला ओरडली असता आरोपीने तिला अश्लील ध्वनीचित्रफीत पाठवण्यास सुरूवात केली. त्यामुळे सदर महिला घाबरली. सुरूवातीला तिने दुर्लक्ष केले. पण आरोपी वारंवार त्रास देत असल्यामुळे तिने हा प्रकार पतीला सांगितला. त्यानंतर निर्मल नगर पोलिसांकडे तक्रार केली होती. याप्रकरणी गुन्हा दाखल करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ( गुन्हे ) रौफ शेख यांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. आरोपी विवाहीत असून त्याचा दोन मुले आहेत. मुंबईतील बेहरामपाडा परिसरात आरोपी भाडेतत्त्वाच्या घरात इतर मित्रासोबत राहतो. आरोपीने गुन्ह्यांसाठी आठ विविध मोबाईलचा वापर केल्याचे तपासत निष्पन्न झाले. आरोपी कमी शिकलेला असला, तरी त्याला मोबाईलमधील तंत्रज्ञानाची बरीच माहिती आहे, असे तपासात समोर आले आहे. त्यामुळे त्याला पकडणे अवघड झाले होते. तंत्रज्ञानाच्या मदतीने आरोपी खानला शुक्रवारी सापळा रचून बेहरामपाडा परिसरातून पोलिसांनी अटक केली. त्यावेळी आरोपीकडून दोन मोबाईल जप्त करण्यात आले. आरोपीच्या मोबाईलच्या तपासणीत तो मुंबईतील २५ महिलांना अशा प्रकारे त्रास देत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# कसारा रेल्वे स्थानकात मोटरमन केबिनमध्ये चित्रफित तयार करणारे नाशिकचे दोन तरूण अटकेत

**कल्याण : विशेष प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कसारा रेल्वे स्थानकात कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून समाज माध्यमांवर प्रसारित करण्यासाठी चित्रफित तयार करणाऱ्या नाशिक येथील दोन तरूणांना रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी अटक केली आहे. राजा हिम्मत येरवाल (२०), रितेश हिरालाल जाधव (१८) अशी अटक आरोपींची नावे आहेत. ते दोघेही नाशिक येथील रहिवासी आहेत. गेल्या दहा दिवसापूर्वी कसारा रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक चारवर उभ्या असलेल्या कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये बेकायदा घुसून आरोपी राजा आणि रितेश यांनी एक चित्रफित तयार केली होती. या चित्रफितीमध्ये ते मोटरमन असल्यासारखे



आणि तेथील यंत्रणेची हाताळणी करत होते. ही चित्रफित या तरूणांनी समाज माध्यमांवर प्रसारित केली होती. लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून ही चित्रफित तयार करण्यात आल्याने रेल्वेच्या सायबर सुरक्षा विभागाने समाज माध्यमांतील या चित्रफितीच्या अनुषंगाने आरोपींचा तपास सुरू केला होता.

रेल्वे स्थानकांमधील सीसीटीव्ही चित्रण, इतर तांत्रिक माहितीच्या आधारे रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी या दोन्ही तरूणांची ओळख पटवली. ते नाशिक येथील रहिवासी असल्याचे समजले. रेल्वे सुरक्षा बळ आणि स्थानिक पोलिसांनी नाशिकमध्ये या तरूणांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली. हे दोन्ही तरूण नाशिकमधून अटक केले.

या तरूणांनी कसारा रेल्वे स्थानकातील कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून बेकायदा चित्रफित तयार केल्याची कबुली रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांना दिली. पोलिसांनी त्यांच्या दोषारोप ठेऊन त्यांना अटक केली. असाच प्रकार यापूर्वी गुलजार शेख याने करून रेल्वे रुळाशी छेडछाड केली होती. त्यालाही अटक करण्यात आली आहे.

# पत्नी-पत्नीच्या मृत्यूप्रकरणी चार वर्षांनी हत्येचा गुन्हा दाखल

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

व्यावसायिक जिग्नेश दोशी (४५) व त्यांची पत्नी काश्मिरा दोशी यांच्या मृत्यूप्रकरणी चार वर्षानंतर कांदिवली पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. पत्नी काश्मिरा यांचा मृत्यू गळा दाबल्यामुळे झाल्याचे न्यायवैधक अहवालातून स्पष्ट झाले आहे. हा अहवाल गुरुवारी प्राप्त झाल्यानंतर कांदिवली पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला. करोनाच्या आर्थिक संकटामुळे गेल्या काही महिन्यांपासून घरभाडे देऊ शकले नसल्याने पती जिग्नेश दोशीने पत्नीची हत्या करून आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. हा प्रकार २५ ऑगस्ट, २०२० रोजी घडला होता. दोशी यांचा १७ वर्षाच्या मुलगा घरी आला. त्यावेळी त्याची आई मृतअवस्थेत खाटेवर पडली होती. त्यानंतर त्याने वडिलांना जोरात हाक मारली. मात्र, वडिलांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. त्याचदरम्यान, त्याला



शौचालयाचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी दरवाजा ढकलला असता वडिलांनी शॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. या संपूर्ण परिसरात खळबळ उडाली होती. दरम्यान, मृतदेहाच्या शेजारी सापडलेल्या चिठ्ठीसापडली होती. त्यात करोनाच्या आर्थिक संकटामुळे गेल्या काही महिन्यांपासून घर भाडे देऊ शकले नसल्याने या जोडप्याने आत्महत्या केली. याप्रकरणी मृत काश्मिरा यांच्या मृत्यूचा अहवाल कांदिवली पोलिसांना प्राप्त झाला असून त्याच्या आधारावर पोलिसांनी भादंवि कलम ३०२ अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी तपासात आरोपी जिग्नेश दोशीने कापडी पट्ट्याने प्रथम काश्मिरा गळा आवळून तिला ठार मारले. त्यानंतर स्वतःच्या हाताची नस कापून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यात यश न आल्यामुळे त्याने कापडी पट्ट्याने शॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केली.

## बेवारस मृतदेह

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र.५०/२०२४ कलम- १९४ भा.ना.सु.संहिता २०२३ अन्वये नामे विमल भादोजी रावत वय अंदाजे- ७० वर्षे, बांधा- सडपातळ, रंग-गोरा,रामप्रसाद यादव चाळ,



कोलडोंगरी १, सहार रोड अंधेरी पूर्व येथे बेवारस महिला राहत्या घरी मिळून आली असून उपचाराकामी कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.संतोष वडे, पोलीस उपनिरीक्षक**
**अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र :**
८८२८५५२२३८
**पोलीस ठाणे क्रमांक :**
०२२२६८३१५६२

# पुण्यात नशेच्या विळख्यात?: विश्रांतवाडीतून १ कोटींचे ड्रग्ज जप्त

**पुणे: विशेष प्रतिनिधी**

**राज्यातील ड्रग्जचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील एफसी रोडवरील एल थ्री लाउंज मधील ड्रग्ज पार्टीचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला होता. त्यानंतर प्रशासनाने कारवाईदेखील केली. पण पुणे शहराला ड्रग्जचा विळखा बसलाय की काय असाही प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. याचे कारण म्हणजे पुणे पोलिसांनी एक कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केल्याची माहिती समोर आली आहे.**

पुण्यातील विश्रांतवाडी जवळील लोहगाव परिसरातून पोलिसांनी एक कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले आहेत. लोहगावमधील विघ्नहर्ता 'अपार्टमेंट'मधून तीन तरूणांकडून एक कोटी रुपयांचे ४७१ ग्रॅम ड्रग्स हस्तगत करण्यात आले आहे. या प्रकरणी तिघांनाही विश्रांतवाडी पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. पुण्यातील गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने ही कारवाई केली असून यात श्रीनिवास संतोष



गोदजे, रोहित शांताराम बेंडे आणि निमिश सुभाष अभनावे या तीन तरुणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही महिन्यांपूर्वी पुण्याजवळील एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात ड्रग्जनिर्मिती होत असून त्याचं इंटरनॅशनल रॅकेट सुरू असल्याचे पोलीस तपासातून समोर आले होते. याला काही दिवस उलटत नाहीत तोच लिलीत पाटील ड्रग्ज प्रकरण उघडकीस आले. हे प्रकरणही ताजे असतानाच दिड दोन महिन्यांपूर्वी पुण्यातील एफसी रोडवरील एल थ्री लाउंज हॉटेलमधील तरुणींना नशा करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला. एफसी रोडवरील एका नामांकित हॉटेलमध्ये काही तरुण बाथरूममध्ये ड्राक्स घेताना आढळून आले. त्यानंतर प्रशासनाने या हॉटेलवर कारवाईदेखील केली. याच दरम्यान राजकीय पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोपही झाले. पण अवघ्या दीड दोन महिन्यात पुण्यात पुन्हा कोट्यवधींचे ड्रग्ज पोलिसांच्या हाती लागले आहेत. त्यामुळे पुणे शहराला ड्रग्जचा विळखा तर पडला नाही ना, असा प्रश्न आता सर्वसामान्य लोक विचारत आहेत.

# महिलेची ४४ लाखांची सायबर फसवणूक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

शेअर्सच्या खरेदी-विक्रीतून नफा मिळून देण्याचे आमिष दाखवून ३९ वर्षीय महिलेची ४४ लाख रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे.

फसवणूक झालेल्या महिलेचे पती राष्ट्रीयकृत बँकेत व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. फेसबुकवरून आरोपी महिलेच्या संपर्कात आले. त्यानंतर त्यांनी तिची फसवणूक केली. याप्रकरणी सायबर पोलीस अधिक तपास




करीत आहेत. आरोपी महिलेला शेअर बाजारातून चांगला नफा मिळून देण्याच्या नावाखाली जम्बिन नावाचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगण्यात आले होते. तिला सुरुवातीला चांगला नफाही होत असल्याचे दिसून येत होते. या महिलेने ५६ व्यवहाराद्वारे ४३ लाख ८७ हजार रुपये आरोपींनी सांगितलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केले. तिला ॲप्लिकेशनमध्ये रक्कम जमा झालेली दिसली. त्यानंतर तिने रक्कम काढण्याचा प्रयत्न केला. परंतु महिलेला ती काढता आली नाही. त्यामुळे आपली सायबर फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले. तिने याप्रकरणी मध्य प्रादेशिक सायबर पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,**
**अंधेरी, मुंबई**
**ई-निविदा सुचना क्र.७ स.न.(२०२४-२०२५)**
**(शुध्दीपत्रक क्र.०१)**

या कार्यालयाचे ई-निविदा सुचना क्र.७ सन २०२४-२५ जा.क्र. काअ/उमुंवि/७३९२, दि. ३०.०७.२०२४ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | पूर्वी प्रसिध्द झालेले | आता करण्यांत आलेला बदल |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. ०६.०८.२०२४ ते दि. १३.०८.२०२४ पर्यंत | दि. ०९.०८.२०२४ ते दि. १६.०८.२०२४ |
| २ | ई-निविदा उघडणे | दि. १४.०८.२०२४ | दि. १९.०८.२०२४ |

वरील बाबी वगळता निविदा सुचनेतील इतर तपशीलात कोणताही बदल करण्यांत आलेला नाही.

जा.क्र.का.अ./उमुंवि/ ७७२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालये
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी मुंबई
दिनांक:- 6 AUG 2024

कार्यकारी अभियंता
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी (प), मुंबई-५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८१५



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,**
**अंधेरी, मुंबई**
**ई-निविदा सुचना क्र.५ स.न.(२०२४-२०२५)**
**(शुध्दीपत्रक क्र.०१)**

या कार्यालयाचे ई-निविदा सुचना क्र.५ सन २०२४-२५ जा.क्र. काअ/उमुंवि/७३८९, दि. ३०.०७.२०२४ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | पूर्वी प्रसिध्द झालेले | आता करण्यांत आलेला बदल |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. ०५.०८.२०२४ ते दि. १२.०८.२०२४ पर्यंत | दि. ०९.०८.२०२४ ते दि. १६.०८.२०२४ |
| २ | ई-निविदा उघडणे | दि. १३.०८.२०२४ | दि. १९.०८.२०२४ |

वरील बाबी वगळता निविदा सुचनेतील इतर तपशीलात कोणताही बदल करण्यांत आलेला नाही.

जा.क्र.का.अ./उमुंवि/ ७७२१
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी मुंबई
दिनांक:- 6 AUG 2024

कार्यकारी अभियंता
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी (प), मुंबई-५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८१२



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,**
**अंधेरी, मुंबई**
**ई-निविदा सुचना क्र.८ स.न.(२०२४-२०२५)**
**(शुध्दीपत्रक क्र.०१)**

या कार्यालयाचे ई निविदा सुचना क्र.८ सन २०२४-२५ जा.क्र. काअ/उमुंवि/७३९१, दि. ३०.०७.२०२४ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | पूर्वी प्रसिध्द झालेले | आता करण्यांत आलेला बदल |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. ०६.०८.२०२४ ते दि. १३.०८.२०२४ पर्यंत | दि. ०९.०८.२०२४ ते दि. १६.०८.२०२४ |
| २ | ई-निविदा उघडणे | दि. १४.०८.२०२४ | दि. १९.०८.२०२४ |

वरील बाबी वगळता निविदा सुचनेतील इतर तपशीलात कोणताही बदल करण्यांत आलेला नाही.

जा.क्र.का.अ./उमुंवि/ ७७२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी मुंबई
दिनांक:- 6 AUG 2024

कार्यकारी अभियंता
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी (प), मुंबई-५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१८१३



# देवेंद्र फडणवीस आरक्षण देणार नसतील तर त्यांच्याशी भांडण करावे लागेल

■ सातारा : नितीन देवळेकर

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठ्यांना आरक्षण देतो म्हणत आहेत आणि आरक्षण देत नाहीत. त्यांना आमच्या समाजाला आरक्षण द्यायचे नाही असे कोण म्हणते, त्यांची नावे सांगा. तुम्ही जर बऱ्या बोलाने आरक्षण देणार नसाल तर आम्हाला आता तुमच्याशी भांडण करावे लागेल, असे सांगत मनोज जरांगे-पाटील यांनी आज पुन्हा फडणवीस यांना लक्ष्य केले. मनोज जरांगे-पाटील सध्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. साताऱ्यातील शांतता फेरीनंतर झालेल्या सभेत त्यांना चक्कर आली होती. त्यामुळे त्यांच्यावर साताऱ्यात उपचार सुरू होते. आज सकाळी त्यांनी माझी प्रकृती ठीक असल्याचे सांगत पुण्याला जाण्यापूर्वी साताऱ्यात पत्रकारांशी संवाद साधला. प्रकृती बिघडल्याची माहिती मिळताच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार शशिकांत शिंदे यांनी आज त्यांची भेट घेतली. देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसींचे छगन भुजबळ आणि इतर नेते माझ्या विरोधात आणि मराठ्यांच्या अंगावर सोडले आहेत. जे कोण मराठा समाजाच्या विरोधात आहेत, त्यांच्यावर बोलण्यात काही अर्थ नाही. काही झाले तरी फडणवीस यांना समाजाला उत्तर तर द्यावेच लागेल. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांना एकच विनंती आहे की, त्यांनी मराठा समाजाच्या अंगावर येऊ नये. मराठा समाज त्यांना शिंगावर घेतल्याशिवाय राहणार नाही. जर तुम्ही सरळ आरक्षण देणार नसाल तर तुमच्याशी भांडणच करावे लागेल याचा त्यांनी पुनरुच्चार केला. मात्र सरकार ऐकण्याच्या मन:स्थितीत आहे. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मराठा समाजाचे प्रतिनिधित्व करत मध्यस्थी केल्यास माझी काहीच हरकत असणार नाही असेही ते म्हणाले. आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या विरोधात उमेदवार उभा करणार नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे ऐकून मराठा समाजाचे आंदोलन सुरू असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटल्याचे निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले, ज्यांना पहिल्यापासून गाड्या फोडणे आणि दहशतवाद माजविणे हे जमते, ते शांतता धोक्यात आणतात. त्यांच्याबद्दल जास्त बोलण्यात काही अर्थ नाही. राज ठाकरेंना जे वैभव मिळाले आहे, ते गोरगरीब मराठा समाजामुळे मिळाले आहे.

## लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यांतच नव दाम्पत्याची आत्महत्या, संगमनेर तालुक्यातील धक्कादायक घटना

■ संगमनेर : सम्यक कासारे

पुण्यात नोकरीला असलेल्या नव दाम्पत्याने संगमनेर तालुक्यातील साकुर या आपल्या मूळ गावी येत गळफास घेत आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. या दाम्पत्याचे लग्न होऊन अवघे अडीच – तीन महिने झाले होते. झाडाला गळफास घेतलेले त्यांचे मृतदेह आढळून आल्याने हा आत्महत्येचा प्रकार असावा असा पोलिसांचा प्राथमिक कयास आहे. त्यांनी आत्महत्या का केली किंवा इतर काही कारण आहे काय या दृष्टीने पोलीस तपास करत आहेत. वैभव दत्तात्रय आमले (वय २३ वर्ष) आणि स्नेहा वैभव आमले (वय २० वर्ष) असे गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या नव दाम्पत्याचे नाव असून साकुरच्या




मुळा नदीजवळ मांगमळीत रविवारी (११ ऑगस्ट) रात्री काही ग्रामस्थांना त्यांचे मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत दिसून आले होते. घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक निवांत जाधव, पोलीस कर्मचारी प्रमोद गाडेकर व सुभाष बोडखे घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी संगमनेरला पाठविले आहे. उत्तरीय तपासणीचा अहवाल आल्यानंतर मृत्यूच्या नेमक्या कारणांचा उलगडा होईल. अवघ्या दोन-तीन महिन्यांपूर्वी विवाह झालेले हे नव दाम्पत्य पुण्यात नोकरी करत होते. मात्र त्यांनी गावाकडे साकुरला येत रविवारी रात्री आत्महत्या केल्याचे सांगितले जात आहे.

## घरोघरी तिरंगा मोहिमेसाठी सुमारे साडेतीन कोटी खर्च, महापालिकेच्या प्रत्येक विभागाला १२ लाख रुपये निधी देणार

■ मुंबई : यश सावंत

यावर्षीही स्वातंत्र्य दिनानिमित्त 'घरोघरी तिरंगा' ही मोहीम राबवण्यात येणार आहे. या मोहिमेनिमित्त घरोघरी मोफत तिरंगा वाटप केले जाणार आहे. तसेच विभागांमध्ये तिरंगा यात्रा, तिरंगा दौड, सुशोभिकरण, रोषणाई करण्यात येणार असून या कामासाठी मुंबई महानगरपालिका तब्बल साडेतीन कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करणार आहे. महापालिकेच्या २४ विभाग कार्यालयांना प्रत्येकी १२ लाख रुपये, शिक्षण विभागाला ५२ लाख रुपये आणि तिरंगा खरेदीसाठी वेगळा निधी खर्च केला जाणार आहे. दोन वर्षांपूर्वी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र सरकारच्या निर्देशानुसार देशभरात 'घरोघरी तिरंगा' हे अभियान राबविण्यात आले होते. त्यावेळी राष्ट्रध्वजाचे मोफत वाटपही करण्यात आले होते. ते जपून



ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले होते. आता यंदा केंद्र सरकारच्या निर्देशानुसार 'घरोघरी तिरंगा' हे अभियान एक वर्षाच्या खंडानंतर पुन्हा एकदा राबवण्यात येणार आहे. त्यासाठी मुंबई महापालिकेची यंत्रणा कामाला लागली आहे. या अभियानासाठी पालिकेने २० लाख झेंडे खरेदी केले असून ते घरोघरी वितरित केले जाणार आहेत. त्याकरीता पालिकेची विभाग कार्यालये शनिवार आणि रविवारीही खुली ठेवण्यात येणार आहेत. मुंबईत ३५ लाख निवासस्थाने आणि आस्थापना आहेत. त्याकरीता दोन वर्षांपूर्वी ५० लाख राष्ट्रध्वज खरेदी करण्यात आले होते. प्रत्येक घरी, प्रत्येक इमारत, सर्व शासकीय, निमशासकीय आस्थापना, खासगी आस्थापना, विविध संस्था, सहकारी संस्था यांच्या इमारतीवरही राष्ट्रध्वज फडकविण्यात येणार आहेत. तसेच तिरंगी रोषणाई देखील केली जाणार आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर ९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत देशभरात 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. या कालावधीत मुंबईमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत. तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, मानवंदना सोहळा, तिरंगा मेळा आदी उपक्रमांचा यामध्ये समावेश आहे. ९ ऑगस्ट २०२४ रोजी ऑगस्ट क्रांती मैदान येथे या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ सोहळा पार पडला. त्यानंतर मुंबईतील विविध प्रशासकीय विभागस्तरावर तिरंगा यात्रा, तसेच तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिकेच्या सर्व २२७ प्रभागांमध्ये शनिवारी तिरंगा रॅली पार पडली.

## रेल्वेच्या विनातिकीट प्रवाशांकडून ५७ कोटी रुपये दंड वसूल

■ मुंबई : यश सावंत

गेल्या चार महिन्यांत पश्चिम रेल्वेवरील लोकल, मेल/एक्स्प्रेस, पॅसेंजर ट्रेन आणि विशेष रेल्वेगाड्यांमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करून ५७ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. यामध्ये मुंबई उपनगर विभागातून दंडापोटी वसूल करण्यात आलेल्या



१७.३९ कोटी रुपयांचा समावेश आहे. पश्चिम रेल्वेच्या वाणिज्य विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एप्रिल ते जुलै या कालावधीत तिकीट तपासणी करून ५७ कोटी रुपये दंड वसूल केला. जुलै २०२४ मध्ये आरक्षित न केलेले सामान घेऊन जाणाऱ्या १.२२ लाख विनातिकिट प्रवाशांवर कारवाई करून ५.२० कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच वातानुकूलित लोकलमधून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रोखण्यात आले. विनातिकीट प्रवास करणाऱ्या १७ हजार ४०० प्रवाशांकडून ६० लाख रुपये दंड वसूल करण्यात आला.

## उद्धव ठाकरेंच्या ताफ्यावरील हल्ल्यावर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया, 'ही तर ॲक्शनला रिॲक्शन'

■ ठाणे - दिगंबर जाधव

ठाकरे गट प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर हल्ला झाला. एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यामध्ये उद्धव ठाकरे यांची सभा पार पडली. मात्र त्यांच्या ताफ्यावर हल्ला करण्यात आला. याचे राजकीय वर्तुळामध्ये परिमाण दिसून येत असून विविध नेत्यांनी यावर प्रतिक्रिया देखील दिल्या आहेत. उद्धव ठाकरे यांच्या ताफ्यावर शेण, नारळ आणि बांगड्या फेकण्यात आल्या. यामुळे शिवसैनिक प्रचंड नाराज आहेत. या संदर्भात आता शिंदे गटाचे नेते व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांशी संवाद साधताना ही ॲक्शनला रिॲक्शन असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यामांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्याविषयी विचारण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, या सगळ्याची सुरुवात राज ठाकरेंच्या



मराठवाडा दौऱ्यात झाली. बीडमध्ये असताना ठाकरे गटाच्या नेत्यांनी ही सुरुवात केली. ठाकरे गटाच्या नेत्यांनी राज ठाकरेंच्या ताफ्यावर सुपाऱ्या फेकल्या. ते कुणालाही आवडलेलं नाही. ही महराष्ट्राची संस्कृती आणि परंपराही नाही. शेवटी ॲक्शनला रिॲक्शन असते, ती ठाण्यात बघायला मिळाली, पण अशा घटनेचं समर्थन होऊ शकत नाही', असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. पुढे त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. ते म्हणाले, 'ज्यावेळी आम्ही सरकार स्थापन केलं, तेव्हा आम्हालाही हे सरकार दोन महिन्यात कोसळेल, असं म्हणत होते. मात्र, आज दोन वर्ष झाले, आमचं सरकार टीकून आहे. कारण आम्ही बाळासाहेब आणि आनंद दिघे यांच्या विचारावर चालतो आहे. ज्यांनी बाळासाहेब आणि आनंद दिघे यांचे विचार सोडले त्यांच्यावर आता अशा परिस्थितीचा सामना करण्याची वेळ आली आहे', अशी प्रतिक्रियाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

## 'लॉजिस्टिक धोरणा'द्वारे पाच लाख नोकऱ्या; राज्य मंत्रिमंडळाची मान्यता



■ मुंबई : राकेश गायकवाड

येत्या पाच वर्षात राज्यात सुमारे पाच लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणाऱ्या आणि राज्य सरकारला ३० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळवून देणाऱ्या महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरणाला बुधवारी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या धोरणांतर्गत नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय रसद केंद्र (इंटरनॅशनल लॉजिस्टिक पार्क) उभारण्यात येणार असून राज्यभरात दहा हजार एकर जमिनीवर रसद केंद्रे सुरू करण्यात येतील. मनुष्यबळ, वाहतूक सेवा, साठवणव्यवस्था, वितरण यंत्रणा पुरवणाऱ्या 'लॉजिस्टिक' क्षेत्रातील छोट्या व लघू उद्योगांना पूर्वपरवानगीतून पूर्णपणे सूट देणारे हे धोरण असेल. तसेच राज्य शासन मैत्री कक्षाद्वारे छोट्या उद्योजकांना सुविधा उपलब्ध करून देणार आहे. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारसीनुसार उद्योग विभागाने पुढील १० वर्षातील राज्याच्या विकासाला समोर ठेऊन हे धोरण तयार केले आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, मुंबई पोर्ट ट्रस्ट, राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचा या धोरणात सहभाग असणार आहे. त्यानुसार राज्यात सन २०२९ पर्यंत १० हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित रसदविषयक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील. त्यामुळे राज्यात सुमारे ५ लाख इतकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच या धोरणाच्या माध्यमातून राज्याला सुमारे ३० हजार ५७३ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे.

पनवेल येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संलग्न नवी मुंबई-पुणे क्षेत्रात दोन हजार एकरवर आंतरराष्ट्रीय महा रसद केंद्र विकसित करण्यात येणार आहे. या क्षेत्रात तळोजा, पाताळगंगा, रसायने, खोपोली, महाड, रोहा, चाकण, तळेगांव या औद्योगिक वसाहती संलग्न असल्यामुळे पनवेल आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापार व उद्योगांचे प्रमुख केंद्र होईल. या हबच्या विकासासाठी१५०० कोटींची तरतूद करण्यात येणार आहे. हे पुस्तक माझ्या कारकीर्दीचा 'क्लायमेक्स' नाही आणि मध्यंतरही नाही. हा तर केवळ 'ट्रेलर' असून चित्रपट अजून बाकी आहे. आमचे काम बघून अजित पवार हेसुद्धा आमच्या बरोबर सत्तेत सामील झाले.

## नैसर्गिक आपत्तीबाधितांना यंदा निकषाच्या दुपटीने मदत

■ मुंबई : सम्यक कासारे

**आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्यातील सर्व समाजघटकांना खूश करताना यंदा अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधितांना राज्य आपत्ती प्रतिसाद मदतीच्या दुपटीने मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याचा लाभ लाखो कटुंबांना होणार आहे.**

केंद्राच्या नैसर्गिक आपत्ती निकषांच्या धर्तीवर राज्यातही नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यास बाधितांना या निधीच्या माध्यमातून मदत केली जाते.

या मदतीमधील ७५ टक्के वाटा केंद्राचा, तर २५ टक्के भार राज्य सरकारवर असतो. केंद्र सरकारने गेल्या वर्षी नैसर्गिक आपत्तीमधील बाधितांना देण्यात येणाऱ्या मदतीत- नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीच्या मदतीत (२०२२-२३ ते २०२५-२६) या कालावधीसाठी भरीव वाढ केली आहे. त्यानुसार भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, हिमवर्षाव, ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट, यामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद मदतनिधीतून



बाधितांना मदत मिळते, तर राज्यात केंद्राच्या निकषाशिवाय वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यासाठीही राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून आर्थिक मदत केली जाते. राज्यातील महायुती सरकारने २७ मार्च २०२३ रोजी केंद्राच्या धोरणाप्रमाणेच राज्यातही आपत्तीबाधितांना मदत देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र यंदा राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन २७ मार्च २०२३चा निर्णय शिथिल करीत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सध्याच्या मदतीपेक्षा दुपटीने मदत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागातील सूत्रांनी दिली.

महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयानुसार यंदाच्या मान्सूनमध्ये म्हणजेच जून ते ऑक्टोबर दरम्यान अतिवृष्टी व पूर यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना पुरेशी मदत तातडीने मिळावी यासाठी विशेष दराने मदत देण्यात येणार आहे. दोन दिवसांपेक्षा अधिक काळ क्षेत्र किंवा घर पाण्यात बुडाले असल्यास, घर पूर्णत: वाहून गेले असल्यास प्रतिकुटुंब कपडयांच्या नुकसानीसाठी पाच हजार आणि घरगुती भांडी, वस्तूंच्या नुकसानीसाठी पाच हजार असे १० हजार रुपये लगेच देण्यात येणार आहेत. यावेळी घर दोन दिवस पाण्यात बुडाल्याची अटही शिथिल करण्यात आली असून केवळ घरात पाणी शिरुन नुकसान झाले तरीही मदत मिळणार आहे. तर दुकानदारांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे टपरीधारकांना मदत देण्याची तरतूद राज्य आपत्ती निधीत नसली तरी यंदा मात्र मतदार यादीत नाव असलेल्या टपरीधारकांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० हजार रुपये मदत देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

## छगन भुजबळांचं मनोज जरांगेंना खुलं आव्हान; म्हणाले, '२८८ उमेदवार उभे...'

■ सांगली : विशाल कारंडे

राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. मात्र, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शवला आहे, तर मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा आंदोलन आणि उपोषणही केलं. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची बैठकही झाली. मात्र, कोणताही तोडगा निघाला नाही. राज्य सरकारनेही अद्याप मनोज जरांगे यांच्या मागणीसंदर्भात ठोस असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. आता आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा आणि ओबीसीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.

'मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण दिलं नाही तर आपण विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभे करणार', असा इशारा अनेकदा मनोज जरांगे यांनी दिला. आता यावरूनच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना खुलं आव्हान दिलं आहे. 'तुम्ही २८८ उमेदवार निवडणुकीत उभेच करा आणि ८ जागा निवडून आणून दाखवा', असं आव्हान छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना दिलं. छगन भुजबळ आज सांगलीत ओबीसी मेळाव्यात बोलत होते.'राज्यात महायुतीच सरकार आहे. मात्र, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देणं शक्य नाही म्हणजे नाहीच. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देता येणार नाही. मनोज जरांगेंना यांना सांगा की मराठा समाजाला ओबीसीमधून कदापी आरक्षण



मिळणार नाही', असं छगन भुजबळ म्हणाले. 'मनोज जरांगे अनेकवेळा म्हणाले की, मराठा समजाला ओबीसीमधून आरक्षण दिलं नाही तर आम्ही २८८ उमेदवार उभे करणार आहोत. आहो आधी ८८ उमेदवार तर उभे करा आणि त्या उमेदवारामधून फक्त ८ उमेदवारच निवडून आणा. निवडणुकीच्या मैदानात या आणि निवडणुका लढवा. माझं तुम्हाला आव्हान आहे की तुम्ही विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभेच करुन दाखवा', असं खुलं आव्हान छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे यांना दिलं.

## 'मातोश्री'बाहेर मुस्लिमांची निदर्शने; 'वक्फ' सुधारणा कायद्याला विरोध न केल्याने नाराजी

■ मुंबई : गणेश बागडे

लोकसभेत गुरुवारी मंजुरीसाठी सादर झालेल्या 'वक्फ' (सुधारणा) विधेयकाला शिवसेना ठाकरे गटाच्या खासदारांनी विरोध न करता सभात्याग केल्याप्रकरणी मुस्लीम समुदायातील व्यक्तींनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे येथील 'मातोश्री' या निवासस्थानाबाहेर शनिवारी निदर्शने केली. निदर्शक हे भाजपचे दलाल असल्याचा आरोप करत मुस्लिमांच्याच दुसऱ्या गटाने निदर्शकांना तेथून हुसकावून लावले. मुस्लिमांचे दोन गट आमने-सामने आल्याने कलानगर वसाहतीसमोर काही काळ तणाव निर्माण झाला होता. आंदोलन करणाऱ्या १५ ते २० व्यक्ती होत्या. आपण कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसून सामान्य मुस्लीम आहोत, असे त्यांनी



प्रसिद्धी माध्यमांना सांगितले. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला लोकसभा निवडणुकीत मुस्लीम समाजाने एकगठ्ठा मते दिली. मुस्लीम मतांच्या जोरावर ठाकरे यांचे मुंबईत तीन खासदार निवडून आले आहेत. मात्र जेव्हा लोकसभेत 'वक्फ'चे विधेयक मांडले गेले, तेव्हा 'इंडिया आघाडी'च्या खासदारांप्रमाणे ठाकरे यांच्या खासदारांनी विधेयकाला विरोध केला नाही. त्यांनी सभागृहातून पळ काढला, असा आरोप या मुस्लीम निदर्शकांनी केला. आठ-दहा व्यक्तींनी वांद्रे परिसरातील एका कोपऱ्यात काही घोषणा दिल्या म्हणून ते शिवसेनेच्या विरोधातले आंदोलन होत नसते. निदर्शने करण्यास पोलीस परवानगी लागले. या मंडळींना कोणाची फूस आहे, हे सर्वांना माहिती आहे. सर्व गोष्टी ठरवून केल्या जात आहेत.